# लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,लातूर

## -: संचालक मंडळ :-

**मा.आ.श्री. धिरज विलासरावजी देशमुख**

चेअरमन

**मा.ॲड. प्रमोद चंद्रकांत जाधव**

व्हा.चेअरमन

| | |
|---|---|
| मा.आ.श्री.बाबासाहेबजी मोहनराव पाटील | संचालक |
| मा.ॲड.श्रीपतराव निवृत्तीराव काकडे | संचालक |
| मा.श्री.अशोकराव शिवाजीराव पाटील निलंगेकर | संचालक |
| मा.श्री.पृथ्वीराज हरिश्चंद्र सिरसाट | संचालक |
| मा.श्री.अशोक वसंतराव गोविंदपूरकर | संचालक |
| मा.श्री.एन.आर.पाटील | संचालक |
| मा.श्री.व्यंकट धोंडीराम बिरादार | संचालक |
| मा.सौ.स्वयंप्रभाताई धनंजय पाटील | संचालिका |
| मा.श्री.जयेश विश्वंभरराव माने | संचालक |
| मा.श्री.दिलीप मलशेट्टी पाटील नागराळकर | संचालक |
| मा.ॲड.राजकुमार आबासाहेब पाटील | संचालक |
| मा.श्री.भगवानराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर | संचालक |
| मा.श्री.मारोती गोविंदराव पांडे | संचालक |
| मा.श्री.अनुप ज्ञानोबा शेळके | संचालक |
| मा.श्रीमती.लक्ष्मीबाई चंद्रशेखर भोसले | संचालिका |
| मा.सौ.सपनाताई पांडुरंग किसवे | संचालिका |
| मा.सौ.अनिताताई प्रभाकर केंद्रे | संचालिका |
| मा.श्री.दिलीपरावजी दगडोजीराव देशमुख<br>(सहकार, अर्थ, बँकींग व्यवस्थापन तज्ञ) | तज्ञ संचालक |
| मा.श्री.सुनिल हुकुमचंद कोचेटा (कर सल्लागार) | तज्ञ संचालक |
| मा.श्री.एस.व्ही. बदनाळे (जिल्हा उपनिबंधक सह.संस्था लातूर) | शासन प्रतिनिधी |
| मा.श्री.हणमंत जयसिंगराव जाधव | कार्यकारी संचालक |

# **लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, लातूर**

## **शेती कर्जे धोरण**

## **हंगाम २०२४-२५**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्राथमिक शेती संस्थेमार्फत पिक कर्ज / मध्यम मुदत कर्ज वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती उत्पादनात वाढ करता यावी आणि त्यांच्या कर्ज विषयक गरजा पुर्ण करता याव्यात यास्तव सभासदांची परतफेड क्षमता लक्षात घेऊन अल्प/मध्यम/दिर्घ मुदती कर्ज पुरवठा करण्यात येतो. सदर कर्ज प्रकारनिहाय धोरणाचा तपशील खालीलप्रमाणे -

**अ) अल्पमुदत कर्ज योजना :-**

१. किसान क्रेडीट कार्ड योजना

**ब) मध्यम मुदत कर्ज योजना :-**

१. कृषी यांत्रिकीकरण - ट्रॅक्टर कर्ज योजना

२. इलेक्ट्रीक मोटार पाईप लाईन कर्ज योजना

३. उच्च शिक्षण कर्ज योजना

४. शुभमंगल कर्ज योजना

५. तुती लागवड व रेशीम उद्योग कर्ज योजना

६. संकरीत दुधाळ जनावरे खरेदीसाठी कर्ज योजना

७. ठिबक संच कर्ज योजना

८. तुषार संच कर्ज योजना

९. शेडनेट हाऊस व पॉली हाऊस उभारणीसाठी कर्ज योजना

१०. चॉकी सेंटर उभारणीसाठी थेट कर्ज योजना

११. ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी थेट कर्ज योजना

**क) जनता अपघात विमा योजना**

# लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
# मुख्य कार्यालय,लातूर

**अ) अल्पमुदत पिक कर्ज धोरण - हंगाम २०२४-२५**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्राथमिक शेती संस्थाद्वारे पिक कर्ज वितरणासाठी पिक कर्जदराची आवश्यकता आहे. अधिकाधिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती उत्पादनात वाढ करता यावी आणि त्यांच्या कर्ज विषयक गरजा पुर्ण करता याव्यात यास्तव सभासदांची परतफेड क्षमता लक्षात घेऊन अल्पमुदती कर्ज पुरवठा करावयाचा आहे. शेतीसाठी देण्यात येणारे कर्ज उत्पादनाभिमुख असावे आणि ते अधिकाधिक कृषि उत्पादन वाढीस पुरक असावे याबाबी विचारांत घेऊन पिककर्ज दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

नाबार्ड, राज्य बँक यांचे सुचनेनुसार साल सन २०२४-२५ करिता पिक कर्जदर निश्चित करणेसाठी दिनांक ०९.०१.२०२४ रोजी बँकेने जिल्हास्तरीय तांत्रिक समिती सभेचे आयोजन करुन सभेमध्ये निश्चित केलेले पिक कर्जदर तथा पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसायासाठी खेळते भांडवली कर्जदर राज्यस्तरीय समितीकडे मान्यतेस्तव पाठविण्यात आले. तद्नंतर राज्यस्तरीय समिती सभेने निश्चित केलेल्या किमान व कमाल कर्जदराचे दरम्यान जिल्हास्तरीय समिती सभेचे कर्जदर असल्याकारणाने तथा कमी/ज्यादा दर किमान/कमाल कर्जदराचे दरम्यान घेऊन जिल्हास्तरीय तांत्रिक समिती सभेने साल सन २०२४-२५ साठीचे अंतिम पिक कर्जदर निश्चित केले आहेत. पिक कर्ज विषयक धोरण पुढीलप्रमाणे आहे. त्यात वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळास राहील.

**१. अल्प मुदती पिककर्ज पुरवठयासाठी पात्रता व अटी :-**

**I) प्राथमिक सहकारी संस्थासाठी पात्रता व अटी :**

१. संस्थेच्या पोट नियमानुसार बाहेरुन कर्ज उभारण्याची मर्यादा संपुष्टात आलेली असल्यास ती वाढवून घेण्याबाबतचे प्रकरण सहकार खात्याकडे वेळीच पाठविले असले पाहिजे.

२. संस्थेच्या कार्यकारी मंडळावर एकही थकबाकीदार सदस्य नसावा.

३. संस्थेचे दप्तर वेळच्या वेळी व अद्यावत लिहीले असले पाहिजे. संस्था तपासणीसाठी व जिंदगी पत्रक तपासणी साठी संस्थेचे रेकॉर्ड अद्यावत लिहून वेळीच उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

४. खाते फोड, जमीन हस्तांतर व जमीन विक्रीचे रजिस्टर संस्थेने अद्यावत ठेवले पाहिजे आणि तशी माहिती वेळोवेळी बँकेस पुरविली पाहिजे.

५. संस्थेचे संपुर्ण रेकॉर्ड तपासणीचा अधिकार जिल्हा बँक, राज्य बँक, नाबार्ड व सहकार खाते यांना राहील. तपासणीसाठी रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील. तपासणीच्या वेळी परिक्षणाचा दोष पुर्तता अहवाल बँकेस व संबंधित खात्याकडे मुदतीत दाखल केला असला पाहिजे.

६. अल्पमुदत पिक कर्जासाठी अल्पभुधारक व अत्यल्प भुधारक सभासदाकडून २.५ टक्के प्रमाणे व बहूभुधारक सभासदाकडून ५ टक्के प्रमाणे भागाची रक्कम कपात करावी लागेल आणि कपात केलेल्या रक्कमेच्या प्रमाणात संस्थेने बँकेचे भाग खरेदी केले पाहिजेत. भागाची रक्कम वैयक्तिक सभासदास २० टक्के पर्यंत किंवा जास्तीत जास्त रु.२०,०००/- पर्यंत राहील. तथापि मध्यम/दिर्घ मुदत कर्जासाठी कर्ज प्रकारानुसार मुदतठेव / भागाची गुंतवणूक करणे आवश्यक राहील.

७. ग्रामिण बँका, राष्ट्रीयकृत बँका व अन्य वित्तीय संस्थांकडून पिककर्ज घेतलेल्या सभासदांना दुहेरी पिककर्ज पुरवठा / कर्ज वितरण करता येणार नाही.

८. सभासदाकडून चालू वर्षाची सर्व प्रकारच्या कर्जाची वसूलपात्र रक्कम व्याजासह वसूल झाल्यानंतर वसूलपात्र पिक कर्ज मुद्दल रक्कमेइतपत नवीन कर्जपुरवठा करता येईल.

९. वार्षिक साधारण सभेनंतर संचालक मंडळातील सर्व सदस्यांचे सहीचे नमूने बँकेच्या ठराविक फॉर्मवर १५ दिवसांचे आत शाखेस दाखल करावे लागतील. पंचकमेटी सदस्यामध्ये बदल नसलातरीही सहीचे नमुने सभेच्या इतिवृत्तासह बँकेच्या संबंधित शाखेत सादर करुन प्रमाणित करुन घेतले पाहिजेत.

१०. सभासदांना कर्ज वितरण करतांना सहकारी कायदा, संस्था उपविधी व बँकेच्या अटी व नियमानुसार आवश्यक कागदपत्रे / दस्तऐवज करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील. सभासदांकडून घेण्यात आलेल्या ७/१२ व इकरार (डिक्लरेशन) ची प्रत सही शिक्क्यानिशी बँकेस दाखल करावयाची आहे.

११. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम (१०१) (१) अन्वये संस्थेने थकबाकीदार सभासदांचे विरोधात कायदेशीर कार्यवाही केलेली असावी.

१२. बँकेच्या व सहकार खात्याच्या पुर्व परवानगीशिवाय सभासद भाग परत करता येणार नाहीत. तथापि मयत सभासदाचे भाग वारसाचे नावे करणेचा अधिकार संस्थेस राहील.

१३. कर्ज वसुली रक्कमेचा कायमस्वरुपी गुंतवणूकीसाठी उदा. इमारत, जमीन खरेदी, गोदाम, बांधकाम इ. वापर तसेच इतर संस्थेचे भाग खरेदीसाठी विनियोग करता येणार नाही.

१४. कर्ज मंजूरीचे वेळेस संस्थेचे किर्दपावती बुक, कर्ज खतावणी व इतर संबंधित रेकॉर्ड तपासणी करण्याचा अधिकार बँकेस राहील.

१५. इकरार करुन दिलेल्या जमीनीचे गहाणखत, हस्तांतरण अथवा विक्री कर्ज परतफेड न करता परस्पर करता येणार नाही.

१६. सभासदाकडील कर्जाचा भरणा झालेनंतर पुढील हंगामासाठी कर्जाचे नुतणीकरण हे त्याच महिन्यात महिना अखेर करण्यात यावे.

यासाठी सभासद कर्ज प्रस्ताव, संस्था ठराव, कर्ज रोखे, पंचकमेटी सहीनमुना, संस्थेची आर्थिक पत्रके तथा सभासदाकडील जमिनीचे ७/१२, डिक्लेरेशन इ. आवश्यक कागदपत्रे घेण्यात यावीत.

१७. संस्थेचे रेकॉर्ड अद्यावत तारखेपर्यंत पुर्ण केलेले असावे तसेच संस्थेत नियमबाहय हातशिल्लक राहता कामा नये असल्यास जादा हातशिल्लक रक्कम व्याजासह वसूल करणेत यावी.

## II) सभासदासाठी अटी व पात्रता :-

१. सभासद हा कोणत्याही इतर सहकारी वा अन्य वित्तीय संस्थेचा कर्जदार नसावा.

२. कर्ज वितरणासाठी सभासदाकडे किमान ०.२० आर क्षेत्र आवश्यक आहे.

३. राष्ट्रीयकृत, व्यापारी, ग्रामिण किंवा शेडयुल्ड बँकाकडून पिक कर्ज अथवा मध्यम व दिर्घ मुदती कर्ज घेतलेल्या सभासदांना कर्ज मंजूर केले जाणार नाही.

४. सभासदाचे स्वमालकीच्या क्षेत्रावरच कर्ज वितरण केले जाईल.

५. इकरार करुन दिलेल्या जमीनीवरील कर्जाची संपुर्ण परतफेड होईपावेतो त्या जमीनीचे गहाणखत, हस्तांतरण अथवा विक्री करता येणार नाही. तसेच सभासदाने ८अ प्रमाणे असलेली संपुर्ण जमीन सोसायटीकडे इकरार करुन नोंदविणे आवश्यक आहे.

६. इनामी, देवस्थान, सार्वजनिक विश्वस्त संस्था व पब्लीक ट्रस्ट या जमीनीवर कोणतेही कर्ज वितरण केले जाणार नाही.

७. ज्या सभासदांनी खातेफोड करुन घेतली आहे अगर अन्य प्रकारे जमीनीची फोड करुन घेतली आहे अशांचे बाबतीत मुळ खातेदार सभासदांचे नावावर जमीन नसल्यास त्यास कर्ज वितरण होणार नाही व संबंधिताची जमीन ज्या खातेदाराचे नावावर वर्ग झालेली आहे अशा खातेदार सभासदाचे नावावर नवीन कर्ज मंजूरी देता येईल. तत्पुर्वी मुळ खातेदाराकडील सर्व प्रकारचे येणे कर्जाची संपुर्ण वसुली होणे आवश्यक राहील.

   थकबाकीदार सभासदाच्या एकत्र कुटुंबातील कोणाही सभासदास कर्ज पुरवठा केला जाणार नाही. थकबाकीदार सभासदाने त्यांचेकडील थकीत रक्कमेचा भरणा केल्यानंतर आवश्यक कागदपत्रांच्या पुर्ततेअंती तालुका फिल्ड ऑफिसर यांचे परवानगीने कर्ज वितरण करता येईल.

८. कर्जदार सभासदांनी अल्पमुदती कर्जाच्या किमान २० टक्के किंवा कमाल रु.२०,०००/- यापैकी कमी रक्कमेइतपत संस्थेचे भाग खरेदी केले पाहिजेत. पुर्तता होईपर्यंत बहूभुधारक सभासदाचे ५ टक्के प्रमाणांत व अल्पभुधारक सभासदाचे २.५ टक्के प्रमाणांत भाग कपात केले जातील. मध्यम व दिर्घ मुदती कर्जासाठी कर्ज प्रकारानुसार मुदतठेव / भागाची गुंतवणूक करणे आवश्यक राहील.

९. सामाईक जमीनीवर सर्व हिस्सेदारांना कर्ज वितरण केले जाणार नाही. मात्र सामाईक जमीनधारक सर्व हिस्सेदारांनी रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोटरीसह बँकेने प्रमाणीत केलेल्या नमुन्यात संमती दिल्यास कोणाही एकाच्या नावाने संपुर्ण क्षेत्रावरती कर्ज वितरण करता येईल.

१०. अज्ञान सभासदाच्या पालकाने मायनर गार्डीयन ॲवार्ड ॲक्टखाली मा. उपजिल्हाधिकारी यांचेकडील परवाना पत्र बँकेकडे सादर केल्यास नियमानुसार कर्ज वितरण केले जाईल.

११. महाराष्ट्र प्रोव्हिजन ऑफ फॅसलिटीज फॉर ॲग्रीकल्चर क्रेडिट बाय बँक ॲक्ट १९७४ ॲण्ड रुल्स १९७५ अन्वये ज्या संस्थेचा बोजा प्रथम नोंदविला आहे त्या संस्थेस कर्ज वसूलीचा कायदेशीर

अग्रक्रम प्राप्त आहे. म्हणून इतर वित्तीय संस्थांचा पुर्वीचा बोजा कमी करुन घेऊन मुख्यालयाची परवानगी घेतल्याशिवाय कर्ज बोजा नोंद असलेल्या क्षेत्रावर कर्ज दिले जाणार नाही.

१२. संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर ६० टक्के आणि जून अखेर ८० टक्के असल्यास मा.संचालक मंडळाच्या निर्णयानुसार नवीन व बिगर कर्जदारांना पिककर्ज वाटप करणेत येईल.

१३. कर्जदार सभासदाची कर्जापोटी तारण दिलेली जमीन परस्पर विक्री, गहाण किंवा हस्तांतर केली असल्यास खरेदीदार किंवा संबंधित इसमाकडून मुळ कर्जदाराची कर्जाची रक्कम वसूल करण्याचा किंवा त्यांचे शेती माल विक्रीतून वसूल करण्याचा कायदेशीर अधिकार बँकेस राहील.

१४. कोरडवाहू व बागायती शेती करणाऱ्या सभासदांची संस्थेकडून कर्ज घेण्याची सभासदाची वैयक्तीक कमाल कर्ज मर्यादा रु.५.०० लाखापर्यंत राहील.

१५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४४(अ) अन्वये सभासदाकडील अल्प मुदती कर्ज व्याजाची वसूली मुद्दल रक्कमेच्या दुपटीपेक्षा जास्त करता येणार नाही. दामदुपटीचा हा निर्णय बँकेने शेती विकासांतर्गत दिलेल्या मध्यम मुदत कर्ज, दिर्घ मुदत कर्ज, पाणीपुरवठा योजना अंतर्गत दिलेले कर्ज, बिगरशेती कारणासाठी दिलेले कर्ज अथवा कमर्शिअल ॲक्टीव्हीटीज करीता दिलेले कर्ज रु.१००००/- पेक्षा जास्त रक्कमेचे असेल तर यांना हा नियम लागू नाही.

१६. राज्य बँक, राष्ट्रीय बँक यांनी वेळोवेळी बदल केलेल्या प्रचलित व्याज दराप्रमाणे संस्था व सभासदास व्याज आकारणी करणेत येईल.

❖ **कर्ज वितरण :**

१. संपुर्ण कर्ज वितरण हे पिकनिहाय मंजूर मर्यादेस अनुसरुन किसान क्रेडिट कार्डवर करणेत येईल.

२. खरीप, रब्बी व ऊस पीक कर्जासाठी पीक लागवड कालावधीनुसार पुर्व हंगामी, सुरु, खोडवा लागवड तारीख विचारात घेऊन कर्ज मंजूर करणेत येईल.

३. कर्ज मागणी मंजूरीपुर्वी संस्थेची किर्द, पावती बुक, कर्ज खतावणी, मिनट बुक इत्यादी रेकॉर्ड तपासणीसांनी तपासून कर्ज वसूलीची रक्कम बँकेत भरल्याची खात्री करुन कर्ज वितरण करावयाचे आहे.

४. सभासदांना कर्ज वितरण करताना सभासद अल्पभुधारक किंवा बहूभुधारक आहे याची खातरजमा करणेसाठी नवीन ८ अ व ७/१२ डिक्लरेशनसह संस्था पोटनियम व सहकारी कायद्यास अनुसरुन आवश्यक ती कागदपत्रे करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

५. किसान क्रेडिट कार्ड योजने अंतर्गत पीक कर्ज वाटप व परतफेड कालावधी खालीलप्रमाणे असेल.

| हंगाम | वाटप कालावधी | परतफेडीची तारीख |
|---|---|---|
| खरीप | १ एप्रिल ते ३० सप्टेंबर | ३१ मार्च |
| रब्बी | ०१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर | ३१ मे |
| ऊसपिके | हंगामानुसार | ३० जून |

➢ **खंडीत पिक कर्ज वाटप :-**

सभासदाचे पिक कर्ज खाते निरंक झाल्यानंतर सभासदाच्या मागणीप्रमाणे दोन वर्षापर्यंतचे खंडीत पिक कर्ज प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह मुख्यालयास शिफारस करुन पाठविल्यास कर्ज वाटपास मंजूरी दिली जाईल. जादा कालावधीचे / चुकीचे प्रस्ताव मुख्यालयास दाखल करण्यात पाठवू नयेत. याबाबत मुख्यालय परिपत्रक जा.क्र.कर्जे-नियंत्रण/फा-१/६६६३/२०१४-१५ दिनांक २३.०१.२०१५ अन्वये कार्यवाही करावी.

➢ **मयत सभासदांच्या वारसांना व जमीन हस्तांतरीत केलेल्या सभासदांना पिक कर्ज वाटप :-**

मयत सभासदाकडील कर्जबाकी व्याजासह परतफेड केली असल्यास वारसाचे नावाने वाटप करणेसाठी तथा एकत्र कुटुंबातील जमीन वारसाचे नावाने हस्तांतरीत / फोड केली असल्यास हस्तांतरीत क्षेत्रानुसार कर्ज वाटप करणेसाठी मुख्यालय मंजूरी ऐवजी तालुका फिल्ड ऑफिसर यांचेकडे संस्था ठरावासह इतर आवश्यक सर्व कागदपत्रे सादर करुन तालुका फिल्ड ऑफिसर यांचे मान्यतेने कर्ज वाटपाची कार्यवाही करावी. अशा कर्ज वितरणाची स्वतंत्र माहिती शाखेत दप्तरी ठेवावी. याबाबत मुख्यालय पत्र दि.०१.०२.२०२२ अन्वये शाखांना कार्यवाहीस्तव कळविण्यात आलेले आहे.

❖ **ऊस कर्ज :**

१. साखर कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी सभासदांना कारखाना लागण नोंद दाखल्यासह ऊस क्षेत्राची प्रत्यक्ष पहाणी व मोजणी करुन संम्मत पिक कर्जदरानुसार वाटप करणेत येईल.

२. खोडवा ऊसासाठी खोडवा ऊस पिककर्ज दरानुसार व सुरु उसासाठी सुरु ऊसाचे कर्ज दराप्रमाणे प्रत्यक्ष पहाणी करुनच कर्ज वाटप केले जाईल.

३. कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक सभासदाने संबंधित साखर कारखान्याकडे लागण नोंद केलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रासाठी मागणी केल्यास जादा क्षेत्रातील ऊसाची विल्हेवाट तसेच बिगर कारखाना नोंद सभासदाकडून ऊसाची विल्हेवाट गुऱ्हाळ करुन गुळ विक्रीतून अथवा ऊस विक्रीतून कर्जाची परतफेड करीन असे हमीपत्र दिले पाहिजे.

४. नवीन व बिगर कर्जदार सभासदांना ऊस पिककर्ज वितरणाबाबत मुख्य कार्यालयाकडून मा.संचालक मंडळाचे निर्णयानुसार कळविण्यात येईल.

❖ **इतर ऊस उत्पादक :-**

१. साखर कारखान्यास करार करुन देणाऱ्या कारखाना कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादक सभासदांना ऊस क्षेत्राची प्रत्यक्ष मोजणी करुन प्रत्यक्ष पहाणी करुन ऊसाची परिस्थिती, पाणी पुरवठयाची बारमाहीसाठी खात्री करुन कर्ज वाटप केले जाईल.

२. सभासदांना साखर कारखान्याचे ऊसाचे बेणे, खते, पुरविलेली असल्यास त्याची रक्कम परस्पर साखर कारखान्याच्या खात्यास वर्ग करण्यांत येईल. ऊसाचे बेणे इतर ऊस उत्पादक कर्जदार सभासदांकडून घेतले असल्यास बेणेची रक्कम त्या सभासदाच्या कर्जापोटी संबंधित संस्थेच्या कर्ज खाती जमा घेण्यात येईल.

३. सुरु ऊसाची लागण मार्च नंतर केली असल्यास अशा ऊसाच्या उत्पादनात घट येत असल्यामुळे अशा सभासदांना मार्चनंतर लागण केलेल्या ऊसासाठी कर्ज मंजूर केले जाणार नाही.

❖ **किसान क्रेडिट कार्ड योजना :**

शासन तथा बँक निर्णयानुसार प्राथमिक सेवा सहकारी संस्थांच्या सभासदांना अधिक सुलभतेने व तत्परतेने पिककर्ज पुरवठा होणेसाठी किसान क्रेडिट कार्ड द्वारे वाटप करण्याची योजना लागू केली आहे. सदर योजनेची व्याप्ती, शेतकऱ्याची निवड, कर्ज मर्यादा, मंजूरी, किसान क्रेडिट कार्ड वापरासंबंधीची पध्दती, कर्जवाटप / वसूली व्याजदर तसेच इतर अनुषंगीक बाबी खाली नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१. प्राथमिक सहकारी शेती पतपुरवठा संस्थांचे पिककर्जाच्या सर्व चालूबाकीदारांचा समावेश किसान क्रेडिट कार्ड योजनेत केला जाईल. थकबाकीदारांनी त्यांचेकडील कर्जाची संपुर्ण परतफेड केल्यास ते किसान क्रेडिट कार्ड योजनेसाठी पात्र समजले जातील.

२. ज्या सभासदाचे मागील तीन वर्षातील कर्ज व्यवहार नियमीतपणे चालू आहेत व ज्याची वसूली वेळेत नियमीतपणे होते अशा सभासदांचे लागवडीखालील क्षेत्र, नियोजीत पिकपेरा विचारांत घेऊन संमत पिककर्ज दरानुसार कर्जाची वार्षिक एकत्रीत होणारी कमाल मर्यादा व अशा सभासदास संस्थेच्या मुळ कमाल मर्यादा पत्रकांतील मंजूर मर्यादा यापैकी जी कमी असेल तेवढी त्या त्या सभासदांची कमाल कर्ज मर्यादा राहील.

३. सभासदांची कमाल पिककर्ज मर्यादा पाच वर्षासाठी ग्राहय धरण्यात येईल.

४. सहभागी असलेल्या संबंधित संस्थेने विहित नमुन्यातील कमाल मर्यादा पत्रके व सभासदाच्या वैयक्तीक कर्ज व्यवहाराची तसेच वसूलीची माहिती सादर करावी लागेल.

५. मुख्यालयाने मंजूरी दिलेल्या कर्ज मर्यादेनुसार संबंधित शाखेतून सभासदाने व संस्थेने कागदपत्रकाची पुर्तता करुन दिल्यानंतर पीकाखालील क्षेत्राची मोजणी / तपासणी नंतर पिकपेऱ्यानुसार सभासदास कमाल उचल पात्र मर्यादेपर्यंत कर्ज उचल करता येईल.

६. कर्ज वाटप हे पीक लागवडीच्या कालावधीत व मंजूर असलेल्या कर्ज उपमर्यादा यास अधिन राहून करण्यांत येईल. पीक कर्ज उचल केल्यापासून ड्युडेट पर्यंतच्या कालावधीत सभासदाने त्याचेकडील संपुर्ण कर्ज व्याजासह केंव्हाही एकदा परतफेड केल्यास तो सभासद चालू बाकीदार समजण्यात येईल.

७. सभासदाने कर्जाची परतफेड मुदतीचे आत केली पाहिजे. राष्ट्रीय बँकेच्या धोरणानुसार किसान क्रेडीट कार्ड योजनेअंतर्गत केंद्रशासन व राज्यशासन (डॉ. पंजाबराव देशमुख) व्याज सवलत योजनेचा लाभ

मिळणेसाठी सभासदाने कर्जाची परतफेड ही बँकेने निश्चित केलेली परतफेडीची तारीख किंवा उचल तारखेपासून १ वर्षाचे आत यापैकी आधिच्या तारखेपर्यंत परंतु जास्तीत जास्त ३६५ दिवसाचे आत करणे आवश्यक आहे. सभासदाने कर्जाची वसूली रास्त बँकेत जमा करावयास पाहिजे. तथापि, लिंकींगने वसूली दिल्यास ती अधिक चांगली बाब समजण्यात येईल.

८. कर्ज वितरणापुर्वी सभासद कोणत्याही कर्जाचा व वित्तीय संस्थेचा थकबाकीदार असता कामा नये.

९. कर्ज वितरणाचे बँक शाखा पातळीवर सभासदनिहाय कर्जाचे उपखाते व संस्थेच्या नावे मुख्य खाते ठेवण्यात येईल.

१०. सभासदाने केलेल्या कर्ज उचल व भरणा रक्कमेचा संस्था सभासद पातळीवर जमाखर्च करुन त्याचा हिशोब/माहिती नियमीतपणे ठेवणे संस्थेस बंधनकारक राहील.

११. बँकेस आवश्यक असलेल्या कागदपत्रकांची पुर्तता रेकॉर्ड व सभासदाची माहिती तयार करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या गटसचिवाची राहील.

१२. अल्पमुदती शेती कर्जासाठी संस्था व सभासदास बँकेने निश्चित केलेल्या प्रचलित व्याजदरानुसार व्याज आकारणी करुन व्याज व मुद्दलाची वसुली केली जाईल.

१३. बँकेचे शाखाधिकारी / बँक तपासणीस किसान क्रेडिट कार्डावरील कर्जदाराच्या सहीचा नमुना प्रमाणित करतील. अशिक्षीत कर्जदाराच्या बाबतीत त्याच्या डाव्या हाताच्या अंगठयास निशानी शाखाधिकारी / तपासणीस / संस्था सचिव तसेच कर्जदारास ओळखणारा बँक खातेदार सभासद प्रमाणित करतील.

१४. अशिक्षीत कर्जदार सभासदांना संपुर्ण धनादेश पुस्तिका (चेकबुक) न देता प्रत्येक कर्ज उचलीवेळी स्वतंत्र पेस्लिप पुरविण्यात येईल.

१५. किसान क्रेडिट कार्ड हरवल्यास किंवा गहाळ झाल्यास संबंधित शाखेमार्फत चौकशी होऊन आवश्यक खात्रीअंती क्रेडिट कार्डाची नक्कल (डुप्लीकेट) दिली जाईल. मात्र त्यासाठी दंड म्हणून रु.२५/- आकारले जातील. मात्र याबाबतची माहिती मुख्य / प्रधान कार्यालयास त्या त्या वेळी संबंधित संस्थेने / शाखेने द्यावयाची आहे.

१६. जे सभासद या योजनेमध्ये समाविष्ट करुन घेतले जातील अशा सभासदांनी स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो पुरविलेल्या किसान क्रेडिट कार्डावर डकवावा. तदनंतर वरील सुचना विचारांत घेऊन क्रेडिट कार्डमधील पुर्ण तपशील योग्य व बरोबर असल्याची खात्री करुन संबंधित शाखा व्यवस्थापक / तपासणीस त्यावर सही करतील.

१७. हंगामानुसार वेळेवर व पुरेसे कर्ज वाटप करणे, वक्तशीर व परतफेड तारखेत कर्जाची वसूली देणे तसेच बँक शाखेतून रास्त कर्जव्यवहार करणे ही ठळक वैशिष्टयै असलेल्या या योजनेचा निवड केलेल्या संस्थांच्या पात्र सभासदांनी अधिकाधिक लाभ घेऊन पीकोत्पादन वाढीचा व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन स्वतःचा आर्थिक फायदा करुन घ्यावा.

## ❖ संस्था सचिव व शाखा तपासणीस यांच्याकरीता महत्वाच्या सुचना :

१. धोरणात दिलेल्या कार्यक्रमानुसार आवश्यक कागदपत्रांची व माहितीची पुर्तता करुन वेळीच संस्थेची क.म.पत्रके / कर्ज मागणी मंजूर करुन घ्यावेत. म्हणजेच शेतकरी सभासदांना खरीप तसेच रब्बी हंगामात वेळीच पतपुरवठा उपलब्ध होईल.

२. बँकेने ठरवून दिलेल्या कर्ज दराप्रमाणे कर्ज मागणी करावी. क.म. पत्रकांत दर्शविलेले लागवडीखालील क्षेत्र व इकरार केलेले क्षेत्र जिंदगी पत्रक व इकरारावरुन तपासून तपासणीस यांनी छाननी करुन अहवालासोबत तसा दाखला दिला पाहिजे. काही कारणास्तव संस्थेच्या शिफारशीपेक्षा तपासणीस यांना कमी शिफारस करावयाची असल्यास त्याबाबत सभासदनिहाय व संयुक्त कारणे द्यावी. सभासदाची गरज व त्याची प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्र विचारांत घेऊनच कर्ज मागणी करावे.

३. सभासदाचे अर्जातील (नमुन्यातील) माहिति पुर्ण बिनचुक भरावी, तसेच कर्ज मागणी तक्त्यातील व सभासदाच्या अर्जातील माहितीत विसंगती असणार नाही अशी दक्षता घ्यावी. तपासणीस यांनी कर्ज प्रकरणाचे छाननीच्यावेळी सदर खात्री करुनच नंतर प्रकरण मुख्य कार्यालयाकडे पाठवावे.

४. ज्या कारणासाठी मध्यम मुदत कर्ज मागणी केलेली असेल त्याबाबत धोरणानुसार आवश्यक माहिती तसेच योजनांची आवश्यकता प्रत्यक्ष पहाणी करुन तपासाअंती तसेच इतर अनुषंगीक माहिती तपासणीस यांचे छाननी अहवालात विस्तृतपणे दिलेली असावी. संस्थेच्या कारभारातील उणीवा व दोषाबरोबर चांगल्या बाबीचेही विवेचन अहवालात असावे. विशेषतः संम्मत धोरणानुसार आवश्यक क्षेत्र व शाखा संस्था कार्यक्षेत्रातील इतर राष्ट्रीयकृत बँका, वित्तीय संस्था, अर्बन बँका, खादी ग्रामोद्योग बेबाकी पत्रकाबाबत खातरजमा व्हावी. कर्जदार व दोन लायक जामीनदाराचे ७/१२ उतारे, ८ अ व इकरार पत्र सही शिक्क्यानीशी जोडण्यात यावेत.

५. क.म.पत्रक कर्ज मागणी प्रस्ताव अथवा मध्यम मुदत / दिर्घ मुदत कर्जाचे प्रकरण शाखेस तपासणीसाकडे दाखल झालेनंतर प्रकरणाची संमत धोरणानुसार रितसर छाननी करुन आवश्यक कागदपत्रे व माहितीची पुर्तता शाखा पातळीवर करुन घेऊन छाननी अहवालात विशेषतः संस्थेच्या कारभारातील उणीवा, गैरव्यवहार, अफरातफर, हातावरील शिल्लक, सभासदांकडील बारमाही बागायत क्षेत्र, परतफेड क्षमता, मागील परतफेडीचा अनुभव, कुंटुंबातील व्यक्तीकडील कर्ज इत्यादीबाबत शिफारस पत्रात उल्लेख असावा. छाननी अहवाल त्रोटक व मोघम असणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

६. क.म.पत्रक व कर्ज प्रकरणांत खाडाखोड करु नये. जेथे दुरुस्ती आवश्यक असेल तेथे संबंधिताच्या सहया असाव्यात. दुरुस्त केलेली आकडेवारी स्पष्ट असावी.

७. कोणतेही कर्जप्रकरण वा क.म.पत्रक शाखेकडे प्रलंबित (पेंडीग) राहणार नाही अशी काळजी तपासणीसांनी घ्यावी. अपुर्ण माहितीबाबत वेळीच पत्रव्यवहार करावा.

८. संबंधित संस्थांनी तपासणीस यांना क.म.पत्रक व कर्ज प्रकरण छाननीच्या दृष्टीने आवश्यक माहिती अथवा कागदपत्रके विनाविलंब उपलब्ध करुन द्यावीत. जेणेकरुन शेतकरी सभासदांची गैरसोय होणार नाही व योग्य सेवा देता येईल. ज्यामूळे सभासदांस संस्थेविषयी / बँकेविषयीची आत्मियता / जिव्हाळा वाढेल.

९. नगदी पीके ऊस, केळी, व द्राक्ष या पिकांचे क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पाहणी केलेले पिक पाहणी अहवाल शाखेत दप्तरी ठेवणेत यावेत.

१०. कर्जधोरण राष्ट्रीय बँक/राज्य बँक व जिल्हा बँकेने वेळोवेळी प्रस्तुत केलेले कर्ज धोरणाची माहिती घेऊन अमंलबजावणी करण्याची जबाबदारी संबधित संस्थेचे गटसचिव व चेअरमन / पंचकमेटी यांची राहील.

११. किसान क्रेडीट कार्ड योजनेअंतर्गत शेतकरी सभासदांना रु.१६००००/- पर्यंतच्या पिक कर्ज वाटपासाठी त्यांचे ७/१२ उता-यावर कर्ज बोजा नोंद करु नये याबाबत दि.२७.११.२०२० रोजीचे मुख्यालय परिपत्रकान्वये सुचना करणेत आली आहे.

# लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., लातूर
## जिल्हास्तरीय तांत्रिक समिती सभेने साल सन २०२४-२५ करिता
## निश्चित केलेले पिक कर्जदर व खेळते भांडवली कर्जदर

| अ.क्र. | पिकाचा प्रकार | पिक कर्जदर प्रती हेक्टरी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **खरीप पिके** | |
| १ | खरीप ज्वारी (बागायत) | २९००० |
| २ | खरीप ज्वारी (जिरायत) | २८००० |
| ३ | बाजरी बागायत | ३०००० |
| ४ | बाजरी जिरायत | २५००० |
| ५ | तूर बागायत | ४०००० |
| ६ | तूर जिरायत | ३८००० |
| ७ | मुग जिरायत | २३००० |
| ८ | मुग उन्हाळी | २६००० |
| ९ | उडीद जिरायत | २३००० |
| १० | भुईमुग (बागायत) / उन्हाळी | ४४००० |
| ११ | भुईमुग (जिरायत) | ४०००० |
| १२ | सोयाबीन | ६०००० |
| १३ | सुर्यफुल (बागायत) | २७००० |
| १४ | सुर्यफुल (जिरायत) | २४००० |
| १५ | कापूस (बागायत) | ६९००० |
| १६ | कापूस (जिरायत) | ५२००० |
| | **बागायती पिके** | |
| १७ | ऊस आडसाली (१५ जुलै ते १५ ऑगस्ट) | १५८००० |
| १८ | ऊस पुर्व हंगामी (१५ आक्टो ते १५ नोंव्हे.) | १६०००० |
| १९ | ऊस सुरु (डिसें., जाने लागवड) | १६०००० |
| २० | ऊस खोडवा (ऑक्टोबर पासून तोडणी झालेल्या ऊसाकरिता) | १४०००० |
| | **रब्बी /उन्हाळी पिके** | |
| २१ | रब्बी ज्वारी (बागायत) | ३३००० |
| २२ | रब्बी ज्वारी (जिरायत) | ३१००० |
| २३ | गहू (बागायत) | ३८००० |

| अ.क्र. | पिकाचा प्रकार | पिककर्ज दर प्रती हेक्टरी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २४ | हरभरा (बागायत) | ५२००० |
| २५ | हरभरा (जिरायत) | ४८००० |
| २६ | करडई | ३६००० |
| | **भाजीपाला पिके** | |
| २७ | मिरची | ७७००० |
| २८ | टोमॅटो | ८०००० |
| २९ | कांदा खरीप | ६५००० |
| ३० | कांदा रब्बी | ८०००० |
| | **फळ झाडे** | |
| ३१ | द्राक्ष | ३२७००० |
| ३२ | डाळींब | १३०००० |
| ३३ | केळी | १००००० |
| ३४ | आंबा (केशर) | १५०००० |
| ३५ | पपई | ७६००० |
| ३६ | लिंबू | ७०००० |
| ३७ | सिताफळ | ५९००० |
| | **इतर पिके** | |
| ३८ | तुती लागवड | १००००० |
| ३९ | रेशीम किडा (silk warm) | १००००० |
| ४० | लाख शेती | ८०००० |
| ४१ | मधुमक्षिका पालन | १००००० |
| ४२ | पशुपालन / दुग्ध व्यवसाय व्यवस्थापन खर्च - | |
| | गाय (१ युनिट) - २ महिने | ३५००० |
| | म्हैस (१ युनिट) - २ महिने | ३७००० |
| ४३ | शेळी/मेंढीपालन व्यवस्थापन खर्च (१० + १ युनिट) ९ महिने | ११०००० |
| ४४ | मत्स्यव्यवसाय व्यवस्थापन खर्च - प्रति हेक्टर शेततळे सर्व जाती मत्स्यसंबंर्धा (Backyard / Medium / Large Ornamental Fish Farming) | ५०००० ते ५००००० |

## ब) मध्यम मुदत कर्ज योजना :

### १) कृषी यांत्रिकीकरण - ट्रॅक्टर कर्ज योजना :-

बँकेमार्फत कृषि यांत्रीकीकरण योजनेअंतर्गंत ट्रॅक्टर खरेदीसाठी मध्यम मुदत कर्ज धोरण स्विकारणेत आलेले आहे. ट्रॅक्टरचा शेतकरी सभासदास शेती व्यवसायाकरिता उपयोग होत असून नांगरणी, पेरणी, शेती व्यवसायासाठी निगडीत कामे ट्रॅक्टरद्वारे पुर्ण होण्यास व वाहतुकीमूळे उत्पादनात वाढ होणेस मदत होत आहे.

**योजना निकष / अटी :-**

१. अर्जदार हा वि. का. संस्थेचा सभासद असावा.
२. सदरचे कर्ज (३२ एच पी वरील ट्रॅक्टरकरिता) ७ वर्षे मुदतीचे (वार्षिक समान सात हप्ते) राहील. (छोटया अश्वशक्ती १२ ते ३२ एच पी ट्रॅक्टरकरिता ५ वर्षे मुदतीने)
३. या कर्जावर बँक संस्थेस द.सा.द.शे. ९.५० टक्के व संस्था सभासदास १०.५० टक्के प्रमाणे तथा छोट्या अश्वशक्ती अश्वशक्ती ट्रॅक्टर कर्जावर संस्थेस ८.५० टक्के व सभासदास ९.५० टक्के प्रमाणे व्याजाची आकारणी करेल.
४. सभासदाकडे स्वमालकीचे किमान २ हेक्टर जमीन क्षेत्र असणे आवश्यक असून छोटया अश्वशक्ती ट्रॅक्टरकरिता १ हेक्टर जमीन क्षेत्र असणे आवश्यक आहे.
५. कोटेशन रक्कमेच्या ८५% बँक कर्ज व १५% सभासद स्वगुंतवणुक राहील.
६. सभासदास कर्ज मंजूरीच्या ५% प्रमाणे कर्जाचे कालावधीसाठी मुदतठेवीच्या प्रचलित व्याजदराने ठेव गुंतविणे आवश्य राहील.
७. सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.
८. ट्रॅक्टर हेड सोबत सभासदाचे मागणीनुसार ट्रेलर व अवजारे करिता कर्ज मंजूरी देता येईल.
९. सभासदाने प्राथमिक सोसायटी व जिल्हा बँकेच्या संयुक्त नावाने ट्रॅक्टरचे हायर पर्चेस डिड नजरगहाण करुन द्यावयाची असून अग्रहक्काबाबत विभागीय वाहतूक अधिकारी यांचेकडे रजिस्ट्रेशन पुस्तकांत (R C Book) सभासद, संस्था व बँक यांच्या संयुक्त नावाने नोंद करुन मुख्यालयास सादर करावे लागेल.
१०. ट्रॅक्टर खरेदी इतक्या रक्कमेची (कॉम्प्रीहेन्सीव्ह) विमा पॉलिसी सभासद, प्राथमिक सोसायटी व जिल्हा बँक यांच्या संयुक्त नावाने घ्यावी अथवा सोसायटी व जिल्हा बँक यांना बेचेन करावी. तदनंतरच्या कर्ज परतफेड कालावधीपर्यंत दरवर्षी विमा पॉलिसीचे नुतणीकरण करणे ही सभासदाची वैयक्तीक जबाबदारी राहील.
११. संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर किमान ६० टक्के व जून अखेर ८० टक्के असावी. संस्था ऑडीट वर्ग अ, ब किंवा क असावा.
१२. सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी असू नये. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

१३. संस्थेस ठरवून दिलेल्या मुदतीत हप्त्याची रक्कम वसूल न झाल्यास थकीत कर्जावर द.सा.द.शे.१.५० टक्के प्रमाणे जादा व्याज आकारले जाईल. पुर्वसुचनेशिवाय व्याजाचा दरात बदल करणेचा अधिकार बँकेस राहील.

१४. बँकेचे संपुर्ण कर्ज व्याजासह परतफेड होईपावेतो ट्रॅक्टर व इतर साहित्याचे हस्तांतर गहाण अथवा विक्री करता येणार नाही. बँकेच्या पुर्व परवानगीशिवाय गहाण हस्तांतर किंवा विक्री केल्यास त्यास सभासदासह संस्थेची पंचकमेटी जबाबदार राहील.

१५. शाखा तपासणीस यांचा विहीत नमुन्यातील ट्रॅक्टर पाहणी अहवाल व बँकेच्या नावाने एच. पी. नोंद केलेले आर. सी. बँक मुख्यालयास दाखल केलेनंतर मुख्यालयाच्या परवानगीनेच संबंधित डिलरला डी.डी. अदा करण्यात येईल.

१६. कर्ज प्रस्तावामध्ये कर्जदार सभासदासोबतच दोन सक्षम जामीनदारांचे ७/१२, ८अ व डिक्लेरेशन जोडणे आवश्यक आहे. जामीनदारांचे ७/१२ इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा नसावा.

१७. सभासदाच्या ८ अ नुसार संपुर्ण जमीनीच्या क्षेत्रावर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केला जाईल.

१८. संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त किंवा सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

१९. प्रस्तावासोबत दाखल करण्यात आलेले कोटेशन बदल करावयाचे झाल्यास रु.१००/- भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्म भरणा करुन मुख्यालय परवानगी घ्यावी लागेल. परस्पर कोटेशन बदल करता येणार नाही.

२०. मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

२१. वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## २) इलेक्ट्रीक मोटार पाईप लाईन कर्ज योजना :-

प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांना मध्यम मुदत इलेक्ट्रीक मोटार पाईप लाईन कर्ज मंजूर करण्याचे धोरण बँकेने अवलंबिले आहे. सदर कर्जाच्या मंजूरीचे निकष / अटी खालीलप्रमाणे आहेत.

**अटी / निकष :-**

**१)** अर्जदार हा वि. का. संस्थेचा सभासद असावा.

**२)** सभासदाकडील उपलब्ध क्षेत्रानुसार प्रति एकरी रु.५००००/- प्रमाणे कर्ज मंजूर करण्यात येईल.

**३)** इलेक्ट्रीक मोटार पाईप लाईन कर्ज कालावधी ७ वर्ष असून कर्ज परतफेड वार्षिक ७ समान हप्त्यात राहील.

**४)** सभासदास प्रकल्प खर्चाच्या १०% प्रमाणे स्वगुंतवणूक करावी लागेल.

**५)** कर्ज मागणी करताना सभासदाकडून ५ टक्के प्रमाणे शेअर्स कपात करुन घेतले जातील.

**६)** इलेक्ट्रीक मोटार पाईप लाईनसाठी द.सा.द.शे. ९.५० टक्के संस्थेस व १०.५० टक्के सभासदास व्याज आकारणी केली जाईल. कर्ज थकबाकी झाल्यास १ टक्का दंडव्याज आकारले जाईल.

**७)** सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.

**८)** सभासदाकडे बारमाही पाण्याची सोय उपलब्ध असली पाहिजे.

**९)** सभासदाकडे पाण्याचे साधन विहीर असणे आवश्यक असून केवळ विहीरीवरुन होणाऱ्या पाईप लाईन साठीच कर्ज मंजूरी देण्यात येईल. तथा योजना नदी, तलाव, कोल्हापूरी बंधारा यावरुन कार्यान्वित करावयाची असल्यास सबंधीत कार्यालयाचा कर्ज कालावधी इतपत पाणी परवाना आवश्यक राहील.

**१०)** सभासदाकडे विद्युत कनेक्शन (स्वतःचे नावाने/कुटुंबातील व्यक्तीचे नावाने) असणे आवश्यक आहे. त्याबाबत विज बिल पावती / डिमांड पावती / लाईन रेडी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**११)** कर्ज प्रस्तावासोबत ISI प्रमाणित कोटेशन (दोन प्रतीत), इंजिनिअरमार्फत नियोजित योजनेचा नकाशा व अंदाजपत्रक (plan & estimate) जोडणे आवश्यक आहे.

**१२)** संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर किमान ६० टक्के व जून अखेर ८० टक्के असावी. संस्था ऑडीट वर्ग अ, ब किंवा क असावा.

**१३)** सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

**१४)** कर्जदार सभासदासोबतच दोन सक्षम जामीनदारांचे ७/१२, ८अ व डिक्लेरेशन जोडणे आवश्यक आहे. जामीनदारांचे ७/१२ इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा नसावा.

**१५)** सभासदाच्या ८ अ नुसार संपुर्ण जमीनीच्या क्षेत्रावर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केला जाईल.

**१६)** शाखा तपासणीस व तालुका फिल्ड ऑफिसर यांचा योजना कार्यान्वित झालेबाबत संयुक्त विनियोग अहवाल मुख्यालयास प्राप्त झालेनंतर मुख्य कार्यालयाच्या परवानगीनंतरच संबंधीत डिलरला डी.डी/आरटीजीएस ने रक्कम अदा केली जाईल.

**१७)** बँकेने दिलेल्या प्रकल्प मंजूरीपोटी प्रत्यक्ष झालेल्या कामकाजानुसार (विनीयोग अहवालानुसार) खालील युनिट कॉस्ट दरानुसार संबंधीत डिलरला पेमेंट केले जाईल.

| **इलेक्ट्रीक मोटार** | | **पाईप लाईन** | |
|---|---|---|---|
| **अश्वशक्ती** | **कर्ज मर्यादा धोरण** | **व्यास** | **कर्ज मर्यादा धोरण** |
| ३ एच.पी. | १९००० | ७५ एम.एम. / ४ के.जी. | रु.१२० प्रत्येक मिटरसाठी |
| ५ एच.पी. | २१००० | ९० एम.एम. / ४ के.जी. | रु.१६५ प्रत्येक मिटरसाठी |
| ७.५ एच.पी. | २९००० | ११० एम.एम. / ४ के.जी. | रु.२४५ प्रत्येक मिटरसाठी |
| १० एच.पी. | ३१००० | | |
| १२.५० एच.पी. | ५१००० | | |

**१८)** संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त/सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

**१९)** प्रस्तावासोबत दाखल करण्यात आलेले कोटेशन बदल करावयाचे झाल्यास रु.१००/- भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्म भरणा करुन मुख्यालय परवानगी घ्यावी लागेल. परस्पर कोटेशन बदल करता येणार नाही.

**२०)** डिलरने बँकेच्या माल पुरवठा पत्राशिवाय इलेक्ट्रीक मोटार - पाईप पुरवठा केल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही. इलेक्ट्रीक मोटार-पाईप लाईन साहीत्य पुरवठा करतांना चर/नाली खोदकाम कामकाज पुर्ण झाल्याची खात्री करावी.

**२१)** इलेक्ट्रीक मोटारसाठीचा विमा सभासद, संस्था व बँकेच्या संयुक्त नावाने उतरविणे ही सभासदाची जबाबदारी राहील.

**२२)** सभासदास ज्या कर्ज कारणासाठी कर्ज मंजूर झाले आहे त्याच कारणासाठी त्याचा वापर झाला पाहिजे. कर्जाचा दुरुपयोग झाल्यास सदरचे कर्ज एकमुस्त परत घेण्याचा अधिकार बँकेस राहिल व असे कर्ज थकीत समजून सक्तीच्या मार्गाने वसूल केले जाईल.

**२३)** मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

**२४)** वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## ३) उच्च शिक्षण कर्ज योजना

बँकेमार्फत जिल्ह्यातील प्राथमिक सेवा सहकारी संस्थेमार्फत शेतकरी सभासदांना पिक कर्जासोबतच शेतीपुरक व्यवसायाकरिता तथा शेतकरी सभासदांचे पाल्यासाठी मध्यम मुदत कर्ज योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे शैक्षणिक कर्ज धोरण स्विकारलेले आहे.

**अटी / निकष :-**

१) अर्जदार हा वि. का. संस्थेचा सभासद असावा.

२) सभासदाकडे किमान १ हेक्टर जमीन क्षेत्र असणे आवश्यक आहे.

३) शैक्षणीक कर्ज हे वैद्यकीय पदवीधर वा पदव्युत्तर (एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीडीएस, बीपीटी (Bachelor of Physiotherapy), फार्म-डी (Doctor of Pharmacy) व पशुवैद्यकीय), इंजिनिअरींग पदवीधर वा पदव्युत्तर (सर्व शाखा), स्थापत्य विशारद पदवीधर वा पदव्युत्तर, एम.बी.ए., औषधशास्त्र पदवीधर वा पदव्युत्तर (B-Farm., M-Farm.) कोर्सेसकरिता मंजूर करणेत येईल.

४) "उच्च शिक्षण कर्ज योजनेअंतर्गंत" देशाअंतर्गंत अथवा परदेशातील उच्च शिक्षणासाठी कर्ज मंजूर करणेत येईल.

१. देशांतर्गत शैक्षणिक कर्ज मर्यादेसाठी रु.८.०० लाख किंवा प्रत्यक्षात असलेली फीस यांचेपैकी जी कमी असेल ती

२. देशांतर्गत वैद्यकीय पदवीधर (Graduation) कोर्सेससाठी रु.२०.०० लाख व वैद्यकीय पदव्युत्तर (Post-Graduation) कोर्सेससाठी रु.३०.०० लाख किंवा प्रत्यक्षात असलेली फीस यांचेपैकी जी कमी असेल ती

३. देशाबाहेरील कोर्सेससाठी रु.२५.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा राहील.

५) योजनेअंतर्गत कोरडवाहू क्षेत्रासाठी प्रति एकरी रु.६००००/- व बागायत क्षेत्रासाठी प्रति एकरी रु.१०००००/- प्रमाणे ७/१२ उताऱ्यावरती कर्ज बोजा नोंद करुन कर्ज मंजूरी दिली जाईल. **अथवा** त्या कर्ज मर्यादेवरील रक्कमेसाठी सभासदाकडील शेतजमीन / स्थावर मालमत्तेचे रेडी रेकनरच्या दुप्पट मुल्यांकनावर रजिस्टर गहाणखतान्वये कर्ज मंजूरी दिली जाईल. मुल्यांकनाची रक्कम ही कर्ज रक्कमेच्या दीडपट असणे आवश्यक आहे.

६) पाल्याची उच्च शिक्षणासाठी झालेली निवड ही मेरीट बेस सलेक्शन पध्दतीने अगर विविध एन्ट्रंस परिक्षेच्या माध्यमातून होणे बंधनकारक राहील.

७) पदवीधर कर्जाचा एकूण कालावधी ८ वर्षे राहील पैकी ४ वर्षे कर्जवाटप व ४ वार्षिक समान हप्त्यात परतफेड तर पदव्युत्तर कर्जाचा एकूण कालावधी ७ वर्षे राहील पैकी ३ वर्षे कर्जवाटप व ४ वार्षिक समान हप्त्यात परतफेड राहील. थोडक्यात पदवीधरांसाठी (Graduation) पहिला परतफेड हप्ता ५ व्या वर्षी व पदव्युत्तरांसाठी (Post-Graduation) पहिला परतफेड हप्ता ४ थ्या वर्षी राहील. मात्र सदर सवलतीचे कालावधीत होणाऱ्या व्याजाचा भरणा हा प्रतिवर्षी करणे गरजेचे आहे. त्यापुढील कालावधीसाठी वार्षिक समान हप्त्यात कर्ज परतफेड करावी लागेल.

८) उच्च शिक्षण कर्ज मंजूर रक्कमेवर संस्थेस व सभासदास प्रतिवर्षी बँक PLR नुसार बँक PLR (Prime Lending Rate) अधिक १% प्रमाणे होणारा व्याजदर लागू राहील. थकबाकी रक्कमेवर १ टक्का जादा व्याज आकारणी करणेत येईल.

९) सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.

१०) पदव्युत्तर अगर पदवीधर शैक्षणीक कालावधीनुसार कर्ज मंजूर करता येईल. कॉलेज टयुशन फिस इतपत कर्जाची रक्कम सिमीत राहील. कर्ज वाटप संबंधीत संस्थेस फिस अदा करणेचे कालावधीत करण्यात येईल. मंजूर कर्जाची रक्कम संबंधीत संस्थेस डी.डी./आरटीजीएस ने अदा करणेत येईल. अगर पालकाने फिस भरल्याची कॉलेजची पावती व मा.प्राचार्य यांचे फिस भरल्याबाबतचे पत्र सादर केल्यास कर्जाची रक्कम पालकाचे खात्यात जमा करणेत येईल.

११) एकत्र कुंटुंबात फक्त एकाच पाल्याच्या उच्च शिक्षणासाठी कर्ज मंजूरी देण्यात येईल. हे उचल कर्ज परतफेड झाल्यास दुसऱ्या पाल्याच्या उच्च शिक्षणासाठी कर्ज मंजूरी दिली जाईल.

१२) सभासदाचा पाल्य एक वर्ष अनुत्तीर्ण झाल्यास त्यास संधी म्हणून पुढील वर्षासाठी कर्ज वितरण करता येईल. परंतु ही संधी कर्ज कालावधीत केवळ एकच वेळा देता येईल. त्यांनतरही पाल्य अनुत्तीर्ण झाल्यास त्यास पुढील कर्ज दिले जाणार नाही व सदरचे कर्ज सभासदास व्याजासह सहा महिन्यात परत करावे लागेल. असे न केल्यास बँक कर्जदार/जामीनदार यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन कर्जाची पुर्ण रक्कम वसूल करील. यासाठी येणारा खर्च संबंधीतांकडून वसूल केला जाईल.

१३) उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेबाबतचा दाखला अगर निवड झाल्याचा अधिकृत दाखला व प्रॉस्पेक्टस प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१४) अर्जात स्कॉलरशिप अथवा इतर उपलब्ध होणाऱ्या सुविधाबाबतचा तपशील देण्यात यावा.

१५) कर्जदार सभासदासोबतच २ सक्षम जामीनदार सभासदाचे (चालूबाकीदार) ७/१२ उतारे, ८अ व डिक्लरेशन जोडण्यात यावे. जामीनदाराचे ७/१२ वर इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा.

१६) सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

१७) जमीन क्षेत्राची पुर्तता होत नसल्यास संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त/सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल. तसेच पाल्याचे कर्ज परतफेडीचे स्वतंत्र हमीपत्र रु.१००/- चे स्टँपपेपरवर २ सक्षम जामीनदारासह नोटरी करुन देणे आवश्यक राहील.

१८) शिक्षण कालावधीतील उचल कर्ज परतफेड मर्यादेइतपत शिक्षणार्थी/विद्यार्थी यांचा वैयक्तीक अपघात विमा उतरविणे बंधनकारक राहील.

१९) धोरणाप्रमाणे कर्ज वाटप करण्याची जबाबदारी तपासणीस व गटसचिव यांची राहील. तथापि, मुख्यालयामार्फत केलेल्या पाहणीत/तपासणीत धोरणबाहय कर्जाचे वाटप झाल्याचे आढळून आल्यास सबंधीतावर प्रशासकीय कार्यवाही करणेत येईल. प्रसंगी निलंबीत करणेत येईल व कर्जाची रक्कम वैयक्तीकरित्या वसूलीस पात्र राहील.

२०) संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर किमान ६० टक्के व जून अखेर ८० टक्के असावी. संस्था ऑडीट वर्ग "अ","ब" किंवा "क" असावा.

२१) मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

२२) वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा व जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## ४) शुभ मंगल कर्ज योजना :-

जिल्हयातील शेती सहकारी संस्थांच्या सभासदांना "शुभ मंगल योजनेअंतर्गंत" मध्यम मुदत कर्ज वितरण करणेबाबत मा. संचालक मंडळाने निर्णय घेतला असून सदर कर्ज मंजूरीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

**प्रमुख अटी / नियम :-**

१. अर्जदार हा वि. का. संस्थेचा सभासद असावा.
२. "शुभ मंगल योजना" १८ वर्षावरील मुलीच्या लग्नासाठी प्राथमिक शेती संस्थेमार्फत राबविणेत येईल. संस्थेने ठराव व लग्न ठरल्याचे ठराव पत्र सादर करावे लागेल.
३. सभासदाकडून ८ अ प्रमाणे क्षेत्र तारण घेण्यात येईल. कोरडवाहू क्षेत्रावर प्रतिएकरी रु.२००००/- प्रमाणे व बारमाही बागायती (ऊस) क्षेत्रावर प्रति एकरी रु.३००००/- प्रमाणे मध्यम मुदती कर्ज मंजूरी दिली जाईल.
४. "शुभ मंगल योजना" कर्जाचा सवलतीचा कालावधी १ वर्ष राहील. त्यापुढील कालावधीसाठी वार्षिक समान ५ हप्त्याने कर्ज परतफेड करावी लागेल.
५. सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.
६. सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
७. कर्जदार सभासदासोबतच दोन सक्षम जामीनदारांचे ७/१२, ८अ व डिक्लेरेशन जोडणे आवश्यक आहे. जामीनदारांचे ७/१२ इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा नसावा.
८. सभासदाच्या ८ अ नुसार संपुर्ण जमीनीच्या क्षेत्रावर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केला जाईल.
९. लग्नासाठी होणाऱ्या संभाव्य खर्चापोटी लग्नपत्रीका व अन्य कागदपत्रकाची पुर्तता झाल्यास लग्नाअगोदर एक महिना १ ला हप्ता ५० टक्के प्रमाणे, २ रा हप्ता २५ टक्केप्रमाणे लग्नाचे ८ दिवस अगोदर व २५ टक्के प्रमाणे तिसरा हप्ता लग्नानंतर ग्राम पंचायतीच्या नमुन्यात विवाह नोंदणी दाखला अदा करण्यात येईल.
१०. योजनेअंतर्गत संस्था व सभासदासाठी द.सा.द.शे. ८.०० टक्के प्रमाणे व्याज आकारण्यात यावे.
११. अपंग, अस्थिव्यंग, मुकबधीर व कर्णबधीर मुलीचे लग्नासाठी लागू दरापेक्षा १ टक्का व्याज कमी आकारण्यात यावे.
१३. संस्थेने सदर कर्जावर कोणत्याही प्रकारचा गाळा घेऊ नये किंवा कर्जावर भाग कपात करु नयेत.
१४. एका कुटुंबात किंवा संयुक्त कर्जदारांना फक्त एकाच मुलीच्या लग्नासाठी कर्ज मंजूरी देण्यात येईल.
१५. लग्न कार्याच्या खर्चाबाबतच्या पावत्या कर्जाचा शेवटचा हप्ता देण्यापुर्वी रेकॉर्डला सादर कराव्या लागतील. तत्पुर्वीचे हप्ते सभासद यांचे हमीपत्रावर अंदाजीत खर्चाच्या आधारे अदा करण्यात येतील. संस्थेचे चेअरमन व गटसचिव यांनी सदर खर्च प्रमाणीत करावा लागेल.
१६. संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर किमान ६० टक्के व जून अखेर ८० टक्के असावी. संस्था ऑडीट वर्ग अ, ब किंवा क असावा.

१७. संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त/सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

१८. सभासदास ज्या कारणासाठी कर्ज मंजूर झाले आहे त्याच कारणासाठी त्याचा वापर झाला पाहिजे. कर्जाचा दुरुपयोग झाल्यास सदरचे कर्ज एकमुस्त परत घेण्याचा अधिकार बँकेस राहील व असे कर्ज थकीत समजून सक्तीच्या मार्गाने वसूल केले जाईल. प्रसंगी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१९. मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

२०. वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## ५) तुती लागवड व रेशीम उद्योग कर्ज योजना :-

बँकेमार्फत यापुर्वी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीचा अवलंब करुन त्यांचे उत्पन्नात वाढ व्हावी किंबहुना रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने वि. का. सभासदांसाठी तुती लागवड व रेशीम उद्योगासाठी १ एकर तुती लागवडीसाठी रु.२८५००, किटक संगोपन साहित्यासाठी रु.४१५०० व किटक संगोपन गृहासाठी रु.२५५००० असे एकूण रु.३२५००० पर्यंत कर्ज मंजूर करणेबाबतचे सुधारीत कर्ज धोरण स्विकारले असून खालील अटी व शर्तीस अधिन राहून कर्ज मंजूरीचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

➢ **अटी व शर्ती :-**

**१)** अर्जदार हा वि. का. संस्थेचा सभासद असावा.

**२)** या योजनेतील लाभधारक रेशीम उद्योग धंद्याच्या दृष्टीने प्रशिक्षीत असावा. प्रशिक्षण प्रमाणपत्र जिल्हा रेशीम कार्यालय तथा संबंधीत मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थेचे असावे.

**३)** सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

**४)** सभासदाकडे किमान १.०० हेक्टर जमीन आवश्यक असून त्यापैकी ०.४० आर क्षेत्रावरती तुतीची लागवड करणे आवश्यक आहे.

**५)** सभासदाकडे बारमाही सिंचनाची व्यवस्था असावी तथा किटक संगोपन गृह बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी.

**६)** योजनेअंतर्गत बँक कर्ज ८०% तथा सभासद स्वगुंतवणूक २० % असेल.

**७)** सदर कर्जाचा कालावधी ३ वर्षाचा असून कर्ज परतफेड सहामाही ६ हप्त्यामध्ये करावयाची आहे.

**८)** सदर कर्ज सभासदास शुन्य टक्के व्याजदराने व संस्थेस वसुल मुद्दल रक्कमेवर प्रोत्साहनपर ०.५० टक्के प्रमाणे राहील. तथापि कर्ज थकीत झालेस सभासदास १०% प्रमाणे व्याजाची आकरणी करुन वसुल करण्यात येईल.

**९)** सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.

**१०)** सदर कर्जासाठी मिळालेल्या अनुदानाची रक्कम तथा सभासदास शासनाकडून मिळणारी अन्य रक्कम परस्पर कर्ज खाती जमा करणेसाठी सभासदांनी रु.१००/- चे बॉण्डवरती हमीपत्र देणे आवश्यक आहे.

**११)** रेशीम किटक संगोपन गृह बांधकामाचे आराखडे व खर्चाचे अंदाजपत्रक सादर करावे लागेल.

**१२)** सभासदाकडे विद्युत कनेक्शन (स्वतःचे नावाने/कुटुंबातील व्यक्तीचे नावाने) असणे आवश्यक असून त्याकरिता डिमांड पावती / विज बिल भरणा पावती/ लाईन रेडी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**१३)** संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर किमान ६० टक्के व जून अखेर ८० टक्के असावी. संस्था ऑडीट वर्ग अ, ब किंवा क असावा.

**१४)** कर्जदार सभासदासोबतच दोन सक्षम जामीनदारांचे ७/१२, ८अ व डिक्लेरेशन जोडणे आवश्यक आहे. जामीनदारांचे ७/१२ इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा नसावा.

**१५)** सभासदाच्या ८ अ नुसार संपुर्ण जमीनीच्या क्षेत्रावर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केला जाईल.

**१६)** शाखा तपासणीस व तालुका फिल्ड ऑफिसर यांनी प्रकल्पास भेट देवून तुतीची लागवड केल्याची खात्री करुनच प्रस्ताव शिफारशीसह मुख्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

**१७)** सदर कर्जाचा विनियोग हा त्याच कारणासाठी होणे आवश्यक असून अन्य कारणासाठी विनियोग झाल्याचे आढळून आल्यास संपुर्ण कर्ज परत मागणेचा अथवा सक्तीने कर्ज वसूल करणेचा अधिकार बँकेस राहील.

**१८)** सभासद व संस्था मागणीनुसार शाखा तपासणीस तथा तालुका फिल्ड ऑफिसर यांचे प्रत्यक्ष पाहणीनुसार

अ) मु.का.च्या मंजुरीनंतर, तुती लागवडीसाठीची रक्कम रु.२८५००/- सभासदाकडून बिल/पावती स्विकारुन (Receipt of Payment) सभासदाच्या बचत खाती जमा द्यावेत.

ब) तदनंतर दुस-या टप्प्यामधील रक्कम (७०% प्रमाणे) रु.१७८५००/- सभासद बचत खाती जमा देवून खरेदी नंतर प्रत्यक्ष पाहणीअंती तेवढया रक्कमेचे बिल/पावती स्विकारुन (Receipt of Payment) त्यांचे मागणीनुसार उर्वरित रक्कम (३०% प्रमाणे) रु.७६५००/- सभासदाच्या बचत खाती जमा द्यावेत.

क) पहिल्या दोन टप्प्यामधील रक्कमेच्या वाटपानंतर शाखा तपासणीस व तालुका फिल्ड ऑफिसर यांचा पाहणी तथा विनीयोग अहवाल (फोटो कॉपीसह) मुख्यालयास सादर करुन मुख्यालयाच्या मंजूरीनंतरच तिसऱ्या टप्प्यामधील किटक संगोपन साहित्याची रक्कम रु.४१५००/- सभासदाचे बचतखाती जमा द्यावेत.

**१९)** संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त किंवा सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

**२०)** प्रस्तावासोबत दाखल करण्यात आलेले कोटेशन बदल करावयाचे झाल्यास रु.१००/- भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्म भरणा करुन मुख्यालय परवानगी घ्यावी लागेल. परस्पर कोटेशन बदल करता येणार नाही.

**२१)** मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

**२२)** वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## ६) संकरीत दुधाळ जनावरे (गाय/म्हैस) खरेदीसाठी कर्ज योजना :-

बँकेमार्फत जिल्ह्यातील वि. का. संस्था सभासदांना शेतीस पुरक जोडधंदा म्हणून संकरित दुधाळ जनावरे (गाय/म्हैस) खरेदीसाठी मा.संचालक मंडळ सभेमध्ये कर्ज धोरण स्विकारले असून योजनेअंतर्गत २ गाई/म्हशी खरेदीसाठी रु.२०००००० पर्यंत (प्रत्येकी रु.१००००००/- प्रमाणे) खालील अटी व शर्तीस अधिन राहून कर्ज मंजूरीचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

➢ **अटी / शर्ती :-**

१. अर्जदार हा वि. का. संस्थेचा सभासद असावा.

२. सभासदाकडे किमान १ हेक्टर क्षेत्र असणे आवश्यकआहे.

३. कर्जदार सभासदासोबतच दोन सक्षम जामीनदारांचे ७/१२, ८अ व डिक्लेरेशन जोडणे आवश्यक आहे. जामीनदारांचे ७/१२ इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा नसावा.

४. सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

५. संस्था परिसरात शासकीय दुध डेअरी / दुध संस्था कार्यान्वित असावी.

६. परिसरातील दुध संस्था / दुध संघ / दुध संकलन केंद्राचे कर्ज वसुलीबाबतचे हमीपत्र देणे आवश्यक आहे.

७. सदर कर्जावर द.सा.द.शे. ९.५० टक्के संस्थेस व १०.५० टक्के सभासदास व्याजदर राहील. हप्ता थकीत गेल्यास दंड व्याज १ टक्का आकारण्यात येईल.

८. एकूण प्रकल्प खर्चाच्या ९०% बँक कर्ज व १०% सभासद स्वगुंतवणूक असेल. अर्जदाराकडे इतर कोणत्याही प्रकारच्या मध्यम मुदत कर्जाची थकबाकी असू नये. तसेच एकत्रित कुटुंबात थकबाकीदार सभासद असू नये.

९. संस्था / सभासदास मंजूर कर्जापैकी ५० टक्के रक्कम म्हणजेच एका जनावरासाठी त्वरीत वाटप करण्यात यावे व उर्वरित ५० टक्के रक्कम म्हणजेच दुसऱ्या जनावरासाठी सहा महिन्यानंतर मुख्यालयाचे पुर्व परवानगीनेच वाटप करण्यात यावे. बँकेच्या धोरणाप्रमाणे वाटप कर्जावर नियमीत व्याजाची आकारणी करण्यात यावी.

१०. संकरीत दुधाळ जनावरांची (सुधारीत जातीची गाय / म्हैस) खरेदी जिल्हयाबाहेरुन तथा जिल्ह्याअंतर्गत नियुक्त करणेत आलेल्या खरेदी समिती मार्फतच करणेत यावी. गठीत समितीमध्ये तालुका फिल्ड ऑफिसर, शाखा तपासणीस, वि. का. संस्था चेअरमन, वि. का. संस्था गटसचिव, वेर्टनरी डॉक्टर, विमा एजंट इ. सदस्यांचा समावेश असावा. शाखा स्तरावर विहित नमुन्यातील खरेदी रजिस्टर समिती सदस्यांचे स्वाक्षरीसह ठेवण्यात यावे.

११. कर्जापोटी खरेदी करुन देण्यात आलेल्या जनावरांचा १ वर्षे कालावधीचा विमा उतरवून त्यापुढील कालावधीसाठी विमा उतरविणेची जबाबदारी वैयक्तिक सभासदाची असेल. तथा खरेदी जनावरांची

वेटर्नरी डॉक्टर यांचेकडून तपासणी करुन Soundness Certificate व १ वर्षे कालावधीची विमा पॉलिसी दप्तरी ठेवणे बंधनकारक राहील.

१२. सभासदाजवळ हिरवा चारा तथा बारमाही पाण्याची सोय (विहीर / बोअर) असलेबाबत गटसचिव व शाखा तपासणीस यांनी प्रत्यक्ष खात्री केल्यानंतरच कर्ज मंजूरीसाठी शिफारस करावयाची आहे.

१३. कर्ज कालावधी हा ३ वर्षाचा राहील. कर्जाची परतफेड सहामाही सहा समान हप्त्यांमध्ये करावी लागेल.

१४. कर्ज परतफेडीच्या हप्त्यानुसार कर्जदाराचे चेक्स (सहा) घेऊन शाखा स्तरावर दप्तरी ठेवण्यात यावेत.

१५. मध्यम मुदत कर्ज मागणी करताना सभासदास वितरण होणाऱ्या निव्वळ बँक कर्जाच्या ५% प्रमाणे शेअर्स कपात करुन घ्यावे लागतील.

१६. सभासदाच्या ८ अ नुसार संपुर्ण जमीनीच्या क्षेत्रावर कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केला जाईल.

१७. संस्थेचा ऑडीट वर्ग अ, ब किंवा क असावा.

१८. संस्थेची बँक स्तरावरील वसुली माहे मार्च अखेर ६०% व जून अखेर ८०% असावी.

१९. जनावरे बांधण्यासाठी शेड / निवारा सभासदाने वरीलप्रमाणे स्वगुंतवणूक खर्च केल्यानंतरच कर्ज वाटप करण्यात येईल. अशी गोठा असल्याची खात्री झाल्यानंतरच डिमांड करण्यात यावी.

२०. खरेदी केलेल्या जनावरांचे पैदासीवरती बँकेचा हक्क राहील. संपुर्ण कर्ज फिटेपर्यंत म्हैस / गाय व पैदासीमधील जनावरांचे गहाण, हस्तांतर किंवा विक्री परस्पर करता येणार नाही असे लेखी संमतीपत्र सभासदाने बँकेस द्यावयाचे आहे.

२१. खरेदीतील जनावरांचा मृत्यु झाल्यास त्याचे वेटर्नरी डॉक्टरकडून पोस्ट मार्टेम करुन विमा कंपनीस व बँकेस १२ तासांच्या आत खबरी जबाब (लेखी सुचना) देण्याची जबाबदारी वैयक्तीक कर्जदार सभासदाची राहील. व सर्व प्रक्रीया पुर्ण करुनच तद्नंतरच मयत जनावराची विल्हेवाट लावावी लागेल.

२२. सभासदाकडे यापुर्वीची जनावरे किती व कोणती आहेत याचा स्पष्ट उल्लेख खात्रीअंती शिफारस पत्रात करण्यात यावा.

२३. संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त किंवा सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

२४. मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

२५. वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## **७) ठिबक संच कर्ज योजना :-**

प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांना ठिबक संचासाठी मध्यम मुदती कर्ज मंजूर करण्याचे धोरण मा. संचालक मंडळ सभा दि.१४.०२.२०१२ रोजी स्विकारलेले आहे.

❖ **प्रमुख अटी / निकष :-**

**१.** अर्जदार हा वि का संस्थेचा सभासद असावा.

**२.** ठिबक संचासाठी सभासदाजवळ कमीत कमी १ हेक्टर स्वमालकीची जमीन असली पाहिजे.

**३.** ऊस पिकासोबतच इतर फळ पिकासाठी ठिबक संच कर्ज पुरवठा करणेत येईल.

**४.** ठिबक संचासाठी प्रति हेक्टरी रु.१०००००/- प्रमाणे प्रकल्प खर्च गृहीत धरुन सभासद मागणीनुसार उपलब्ध क्षेत्राप्रमाणे कर्ज मंजूरी देण्यात येईल.

**५.** ठिबक संचासाठी परतफेड मुदत वार्षिक समान ३ हप्त्यात राहिल.

**६.** ठिबक संच योजनेअंतर्गत मंजूर रक्कमेवर द.सा.द.शे. संस्थेस ९.५०% व संस्थेने सभासदास १०.५०% प्रमाणे व्याजदर लागू राहील. हप्ता थकीत झाल्यास १ टक्का दंड व्याज आकारले जाईल.

**७.** ठिबक संचासाठी प्रकल्प खर्चाच्या ८५% बँक कर्ज व १५% सभासद स्वगुंतवणूक रक्कम असेल.

**८.** सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.

**९.** ठिबक संच साहित्य कृषी विभागाने अधिकृत केलेल्या कंपनीचे आय.एस.आय. मार्क चे असावे.

**१०.** सभासदाकडे विद्युत कनेक्शन (स्वत:चे नावाने/कुटुंबातील व्यक्तीचे नावाने) असणे आवश्यक आहे. त्याबाबत विज बिल पावती / डिमांड पावती / लाईन रेडी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**११.** सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

**१२.** कर्जदार सभासदासोबतच दोन सक्षम जामीनदारांचे ७/१२, ८अ व डिक्लेरेशन जोडणे आवश्यक आहे. जामीनदारांचे ७/१२ वर इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा नसावा.

**१३.** सभासदाच्या ८ अ नुसार संपुर्ण जमीनीच्या क्षेत्रावर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केला जाईल.

**१४.** शाखा तपासणीस व तालुका फिल्ड ऑफिसर यांचा योजना कार्यान्वित झालेबाबत संयुक्त अहवाल (जीएसटी बिलासह) मुख्यालयास दाखल झालेनंतर मुख्य कार्यालयाच्या परवानगीनंतरच संबंधित डिलरला डी.डी. अदा करण्यात येईल. कर्जाची रक्कम सभासदास बचत खात्यावर रक्कम उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

**१५.** बँकेमार्फत सभासदास कितीही कर्ज मंजूरी दिली असली तरी प्रत्यक्ष झालेल्या ठिबक संचाचे उभारणीनुसार होणाऱ्या बिलाच्या रक्कमेस अधिन राहून निर्णयानुसार मंजूरीप्रमाणे ८५% प्रमाणे बिलाची रक्कम अदा करण्यात येईल.

**१६.** महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम कर्ज खात्यावर भरणा करणेची जबाबदारी सभासदाची राहील. तशा आशयाचे हमी पत्र रु.१००/- चे स्टॅम्पवर संस्था व बँक यांना करुन घ्यावे लागेल.

**१७.** संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त किंवा सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

१८. प्रस्तावासोबत दाखल करण्यात आलेले कोटेशन बदल करावयाचे झाल्यास रु.१००/- भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्म भरणा करुन मुख्यालय परवानगी घ्यावी लागेल. परस्पर कोटेशन बदल करता येणार नाही.

१९. संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर किमान ६० टक्के व जून अखेर ८० टक्के असावी. संस्था ऑडीट वर्ग अ, ब किंवा क असावा.

२०. मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

२१. वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

२२. मा. कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ०२.११.२०१२ रोजीचे परिपत्रकान्वये अवलंब करावयाच्या खालील कार्यपध्दतीप्रमाणे मुख्यालयास प्रस्ताव सादर करावेत.

१. तालूका कृषी अधिकारी यांचेकडून ठिबक सिंचन संच बसविण्यासाठी पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर शेतकरी त्यांचे पसंतीप्रमाणे ठिबक संच दरपत्रकांसह आवश्यक कर्जमागणी प्रस्ताव बँकेकडे सादर करतील.

२. ठिबक संच कर्जमागणी प्रस्ताव संस्थेकडून प्राप्त झाल्यानंतर आवश्यक छाननीअंती बँक कर्ज मंजूरीबाबत हमीपत्र शेतकऱ्यांस देईल.

३. हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर लाभार्थी शेतकरी, उत्पादक कंपनीकडून ठिबक सिंचन संच बसविण्यासाठी पुर्वसंमती तपशीलानुसार प्रत्यक्ष शेतावर संच बसवून घेतील.

४. लाभार्थी शेतकरी संच बसविल्यानंतर अनुदानसाठी प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी यांचेकडे सादर करतील. तालुका कृषी अधिकारी मंडळ कृषी अधिकारी व बँक प्रतिनिधी यांचेमार्फत संयुक्त मोका (प्रत्यक्ष स्थळ) तपासणी करुन घेतील.

५. संयुक्त मोका तपासणीच्या अहवालानुसार नोंद घेवून तालूका कृषी अधिकारी अनुदान अदायगीबाबत विहित ऑनलाईन कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव मंजूरीस्तव उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडे सादर करतील. तसेच उत्पादक कंपनी यांना अदा करावयाच्या कर्ज रक्कमेबाबत बँकेस प्रमाणपत्र देतील.

६. प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर बँक शाखेव्दारे कर्ज रक्कमेचा धनादेश शेतकऱ्यांमार्फत / रास्त संबंधित ठिबक सिंचन कंपनीस अथवा डिलरला अदा करील.

७. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेमार्फत अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या संबंधित बँकेच्या कर्ज खात्यावर जमा करतील.

## ८) तुषार संच कर्ज योजना :-

जिल्हयातील उपलब्ध पाणी साठयाचा योग्य वापर व्हावा व जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली यावे या दृष्टीकोनातून प्राथमिक शेती सहकारी संस्थांच्या सभासदास तुषार संच कर्जवाटपाचा निर्णय घेणेत आला आहे. दि.२८.०८.२०२३ रोजीच्या मा.संचालक मंडळ सभेत तुषार संचासाठीच्या वाढलेल्या किंमती विचारात घेऊन संस्था / सभासद विनंतीनुसार बँकेच्या प्रचलित कर्ज मर्यादेमध्ये वाढ करुन एका तुषार संचासाठी रु.३४०००/- पर्यंत खालील अटी व शर्तीस अधिन राहून कर्ज मंजूरीचा निर्णय घेणेत आला आहे. त्यास खालील अटी / निकष लागू आहेत.

१) अर्जदार हा वि. का. संस्थेचा सभासद असावा.

२) सभासदाकडे तुषार संचासाठी किमान १ हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे.

३) तुषार संच योजनेअंतर्गत मंजूर रक्कमेवर द.सा.द.शे. संस्थेस ९.५०% व संस्थेने सभासदास १०.५०% प्रमाणे व्याजदर लागू राहील. हप्ता थकीत गेल्यास दंड व्याज १ टक्का आकारण्यात येईल.

४) आय.एस.आय. प्रमाणित कंपनीचे कोटेशन रक्कमेनुसार ८५% बँक कर्ज व १५% सभासद स्वगुंतवणूक राहील.

५) तुषार संचासाठी परतफेड मुदत वार्षिक समान ३ हप्त्यात राहिल.

६) सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

७) बँकेमार्फत पुरविणेत आलेल्या सभासद कर्ज मागणी प्रस्तावावर सभासदाच्या सहया घेऊन त्या सभासदाचे ८ अ, ७/१२, डिक्लरेशन व एका जामीनदाराचे ७/१२ उतारे, डिक्लरेशन तसेच संस्था कर्जबाकी बाबत प्रमाणपत्र घेण्यात यावे. त्याचप्रमाणे पाणी उपलब्धता व वीज कनेक्शन प्रमाणपत्र (डिमांड) सभासद व संस्थाकडील प्रस्ताव परिपुर्ण असल्याची खात्री करुन डिमांड मंजूर करण्यात येईल.

८) सभासदाने दाखल केलेल्या आय.एस.आय. प्रमाणित अधिकृत कंपनी / डिलर कोटेशननुसार निव्वळ बँक कर्ज वजा जाता उर्वरित रक्कम सभासदाचे बचतखाती जमा घेऊन मुख्यालय मंजूरीनंतर कोटेशनप्रमाणे होणारी एकूण रक्कम (निव्वळ बँक कर्ज + सभासद स्वगुंतवणूक) संबंधित डिलरला RTGS / NEFT व्दारे वर्ग करावी तत्पुर्वी डिलरमार्फत संबंधित खातेक्रमांक, IFSC Code, बँकेचे नाव इ. आवश्यक तपशील घेणेत यावा.

९) तुषार संच हा एका जागेवरुन दुसरीकडे सहज हलविता येण्यासारखा असतो. शेतकऱ्याकडून प्रत्येक संचाची तपासणी करताना हा संच दुसऱ्या शेतकऱ्यांकडून आणला जाऊ नये व त्यामुळे एका संचावर दोन वेळा कर्ज वितरण तथा शासकीय अनुदान वाटप होऊ शकते.

म्हणून तुषार संचाच्या पाईपच्या जोडावर embosing करुन त्यावर कर्जदार शेतकरी सभासदाचे नाव / गाव / वि.का. संस्था व संच बसविल्याचे वर्ष असा मजकूर लिहावा. सदरचा मजकूर ठळकपणे वाचता येईल असा असावा.

१०) प्रत्यक्षात तुषार संच खरेदी न करता कर्जाचे वितरण झाल्याचे निदर्शनास / गैरवापर झाल्यास संस्था गटसचिव / शाखा तपासणीस यांना जबाबदार धरण्यात येईल.

११) तुषार संच खरेदीपोटी कृषी विभागामार्फत मिळणारे अनुदान कर्ज खाती जमा करणेबाबत रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीसह हमीपत्र सादर करावे लागेल.

१२) तुषार कर्जासाठी रु.३४०००/- पर्यंत ७/१२ वर बोजा नोंद करणेची आवश्यकता नाही.

१३) तुषार सिंचन कर्ज वितरणापोटी शेअर्स किंवा ठेव कपात करण्यात येऊ नये.

१४) संस्थेची बँक स्तरावरील कर्ज वसूली मार्च अखेर किमान ६० टक्के व जून अखेर ८० टक्के असावी. संस्था ऑडीट वर्ग अ, ब किंवा क असावा.

१५) संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँक कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त किंवा सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

१६) प्रस्तावासोबत दाखल करण्यात आलेले कोटेशन बदल करावयाचे झाल्यास रु.१००/- भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्म भरणा करुन मुख्यालय परवानगी घ्यावी लागेल. परस्पर कोटेशन बदल करता येणार नाही.

१७) मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

१८) वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## ९) शेडनेट हाऊस व पॉली हाऊस उभारणीसाठी कर्ज योजना :-

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगाराची संधी प्राप्त व्हावी व शेतक-यांच्या जीवनात आर्थिक सक्षमता यावी या उद्देशाने Diversification of loan portfolio अंतर्गत शेडनेट/पॉली हाऊस उभारणी करुन त्यामध्ये भाजीपाला लागवडीकरिता शेडनेट/पॉली हाऊस आकारमान व मॉडेल प्रकारानुसार ०.१० आर व ०.२० आर क्षेत्राकरिता भाजीपाला लागवडीसाठी योजना राबविणेचा निर्णय घेणेत आला आहे.

➢ **योजना - निकष व अटी :-**

१. अर्जदार हा वि का संस्थेचा सभासद असावा.

२. शेडनेटहाऊस कर्ज योजनेअंतर्गत भाजीपाला लागवड करुन उच्च दर्जाचे उत्पादन घेणेसाठी किमान १००० चौ.मी. (०.१० आर) क्षेत्रासाठी व कमाल २००० चौ.मी. (०.२० आर) क्षेत्रासाठी बँक कर्ज मंजूरी देण्यात येईल.

३. ज्या सभासदाचे नावावर शेडनेटहाऊस प्रकल्प उभारण्यात येणार आहे त्याच्या नावाने किमान क्षेत्र २.०० हेक्टर असणे आवश्यक असून पैकी ०.१० आर क्षेत्रावरती शेडनेटहाऊस उभारणीसाठी १.०० हेक्टर क्षेत्र बागायत व ०.२० आर क्षेत्रावरती शेडनेटहाऊस उभारणीसाठी २.०० हेक्टर क्षेत्र बागायत असणे आवश्यक आहे.

४. बागायत क्षेत्रासाठी प्रति एकरी रु.१५००००/- प्रमाणे व जिरायत क्षेत्रासाठी प्रति एकरी रु.७५०००/- प्रमाणे कर्ज मंजूरी देण्यात येईल. सभासदास एकूण कर्ज मंजूरी त्यांचेकडील क्षेत्राचे प्रमाणात देण्यात येईल.

५. शेडनेट हाऊस उभारणीसाठी प्रकल्प खर्चाच्या ९५% पर्यंत (क्षेत्रास अधिन राहून) बँक कर्ज मंजूरी व ५% सभासद स्वगुंतवणूक करणे आवश्यक राहील.

६. सदर कर्जाकरिता २.००% प्रमाणे शेअर्स कपात करण्यात यावेत.

७. सदर कर्जाकरिता संस्थेस ९.५०% व सभासदास १०.५०% प्रमाणे व्याजदर आकारण्यात येईल. थकीत कर्जाकरिता संस्था व सभासदास १.००% प्रमाणे दंड व्याज आकारण्यात येईल.

८. सदर कर्जास सहा (६) वर्षाची मुदत राहील व सहा महिन्याच्या सवलत कालावधीसह समान अकरा सहामाही हप्त्यामध्ये परतफेड राहील.

९. सभासदाकडील उपलब्ध क्षेत्राचे मुल्यांकन कर्ज रक्कमेपेक्षा जादा होणे आवश्यक असून सदर क्षेत्राचे गहाणखत करुन द्यावे लागेल.

१०. सभासदाचे ८ अ प्रमाणे त्यांचे स्वमालकीच्या सर्व ७/१२ उता-यावर मंजूर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केली जाईल.

११. संस्थेची बँक स्तरावरील मागील हंगामातील वसुली मार्च अखेर ६०% व जून अखेर ८०% असावी. संस्था ऑडीट वर्ग अ, ब, किंवा क असावा.

१२. शासनाच्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान - राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाअंतर्गत संरक्षित शेती घटकांतर्गत शेडनेटहाऊस प्रकल्प उभारणी करणेसाठी कृषि विभागाकडून पुर्वसंम्मती (LOI) घेणे सभासदास बंधनकारक असेल.

१३. पुर्वसम्मती पत्राची वैधता (validity) सहा महिन्यांपर्यंत राहील त्यामुळे सभासदांनी विहीत मुदतीत प्रकल्प उभारणी करणे आवश्यक आहे.

१४. सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.

१५. सभासदाकडे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

१६. कर्ज प्रस्तावामध्ये कर्जदार सभासदासोबतच दोन सक्षम जामीनदारांचे ७/१२, ८अ व डिक्लेरेशन जोडणे आवश्यक आहे. जामीनदारांचे ७/१२ इतर बँकेचा कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा नसावा.

१७. सभासदाच्या ८ अ नुसार संपुर्ण जमीनीच्या क्षेत्रावर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद केला जाईल.

१८. कर्ज प्रस्तावासोबत नियोजीत योजनेच्या जमिनीचा नकाशा व चतु:सीमा जोडणे आवश्यक राहील.

१९. लाभार्थी शेतक-यांनी शेडनेट/पॉली हाऊस उभारणी अनुषंगाने प्रशिक्षण घेणे बंधनकारक असून कर्ज प्रस्तावासोबत प्रशिक्षण प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

२०. सदरील प्रकल्पासाठी स्वमालकीच्या जागेसह विज कनेक्शन व पुरेसे पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

२१.योजनेअंतर्गत मिळणारे शासन अनुदान मंजूर करुन घेणेची जबाबदारी सभासदाची राहील, अनुदानाची रक्कम थेट कर्ज खाती वळते करुन घेणेबाबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सभासदाने सम्मती देणे आवश्यक राहील.

२२.संरक्षित शेती घटकांतर्गत शेडनेट हाऊस प्रकल्पाची कृषी विभागाचे मार्गदर्शक सुचनेनुसार घटकनिहाय ठरवून दिलेल्या तांत्रिक निकषानुसार व विहीत केलेल्या दर्जानुसारच तांत्रिकदृष्टया योग्य प्रकारे उभारणी करणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.

२३.कर्ज वाटपाचे वेळी शेडनेटहाऊची पहिल्या वर्षाची संयुक्त (संस्था व बँक) विमा (पॉलिसी शेड्युलसह) पॉलिसी सादर करावी लागेल व त्यापुढील कालावधीसाठी नुतणीकरणाची जबाबदारी सभासदाची राहील.

२४. संयुक्त / सहतारण क्षेत्रावर कर्ज मंजूरी देता येईल. सहतारण क्षेत्रावर बँके कर्जाचा बोजा नोंद केला जाईल. तसेच संयुक्त किंवा सहतारण क्षेत्रावर कर्ज देणेबाबत बँकेच्या विहित नमुन्यात रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

२५.प्रस्तावासोबत दाखल करण्यात आलेले कोटेशन बदल करावयाचे झाल्यास रु.१००/- भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्म भरणा करुन मुख्यालय परवानगी घ्यावी लागेल. परस्पर कोटेशन बदल करता येणार नाही.

२६.मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

२७. वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

➢ **कर्ज वितरण पद्धत : -**

निकषाप्रमाणे माल प्राप्त झालेनंतर खालील चार टप्प्यानुसार कर्ज वितरणाची कार्यवाही करावी.

१. शेडनेट हाऊस उभारणी :- GI स्ट्रक्चर उभारणी
२. Irrigation System
३. रोपांची खरेदी / लागवड :- रोपांची डिलिव्हरी झालेची खात्री करावी.
४. इतर आवश्यक बाबी :-
    अ) बेड तयार करणे
    ब) औषध, खते
    क) लागवडी खर्च
    ड) आधारासाठी वायर मॅश (supported net) इ.

वरीलपैकी १, २, ३ व ४ प्रमाणे काम पुर्ण झालेनंतर तपासणीस व तालुका फिल्ड ऑफिसर यांचे संयुक्त स्थळ पाहणी अहवाल (फोटोसह) मुख्यालयास सादर करुन मुख्यालयाचे परवानगीनंतर डी.डी./आरटीजीएस/एनईएफटी व्दारे पेमेन्ट अदा करावे.

- शेडनेट/पॉली हाऊस उभारणीकरिता कृषी विभागामार्फत निश्चित केलेल्या खर्चाच्या तपशीलानुसार ०.१० आर व ०.२० आर क्षेत्राकरिता भाजीपाला लागवडीसाठी आकारमानानुसार (Round type व Flat type) प्रति चौ.मी. क्षेत्रासाठी येणाऱ्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**शेडनेट हाऊस :-**

| **शेडनेट आकार** | **मॉडेलचा प्रकार** | **शेडनेट हाऊस आकार** | **एकूण क्षेत्र चौ. मी.** | **प्रति चौ.मी. खर्च (रु.) (मापदंड)** | | | **अंदाजित खर्च** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **शेडनेट हाऊस उभारणी** | **भाजीपाला लागवडी साठी येणारा खर्च** | **एकूण खर्च** | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| शेडनेट हाऊस (Round type) ५ मी.उंची | NHM-RTNH 5M-1000 | 36 X 28 | 1008 | 710 | 140 | 850 | 856800 |
| | NHM-RTNH 5M-2000 | 36 X 56 | 2016 | 710 | 140 | 850 | 1713600 |
| | | 42 X 48 | 2016 | 710 | 140 | 850 | 1713600 |
| शेडनेट हाऊस (Round type) ४ मी.उंची | NHM-RTNH 4M-1000 | 36 X 28 | 1008 | 710 | 140 | 850 | 856800 |
| | NHM-RTNH 4M-2000 | 36 X 56 | 2016 | 683 | 140 | 823 | 1659168 |
| | | 42 X 48 | 2016 | 683 | 140 | 823 | 1659168 |

| शेडनेट आकार | मॉडेलचा प्रकार | शेडनेट हाऊस आकार | एकूण क्षेत्र चौ. मी. | प्रति चौ.मी. खर्च (रु.) (मापदंड) | | | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेडनेट हाऊस उभारणी | भाजीपाला लागवडी साठी येणारा खर्च | एकूण खर्च | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| शेडनेट हाऊस (Flat type) ४ मी.उंची | NHM-FTNH 4M-1000 | 20 X 52 | 1040 | 710 | 140 | 850 | 884000 |
| | NHM-FTNH 4M-2000 | 32 X 64 | 2048 | 646 | 140 | 786 | 1609728 |
| शेडनेट हाऊस (Flat type) ३.२५ मी.उंची | NHM-FTNH 3.25M-1000 | 22 X 46 | 1012 | 595 | 140 | 735 | 743820 |
| | NHM-FTNH 3.25M-2000 | 40 X 52 | 2080 | 503 | 140 | 643 | 1337440 |

**पॉली हाऊस :-**

| मॉडेलचा प्रकार | एकूण क्षेत्र (चौ.मी.) | सुधारीत खर्चाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति चौ.मी.खर्च (रु.) (मापदंड) | | | अंदाजित खर्च (रक्कम रु.) |
| | | पॉली हाऊस उभारणी | भाजीपाला लागवडी साठी | एकूण खर्च | |
| OVPH 1000 | 1008 | 935 | 140 | 1075 | 1083600 |
| OVPH 2000 | 2080 | 890 | 140 | 1030 | 2142400 |
| CCPH 1000 | 1008 | 1465 | 140 | 1605 | 1617800 |
| CCPH 2000 | 2080 | 1420 | 140 | 1560 | 3244800 |

## १०) चॉकी सेंटर उभारणीसाठी थेट कर्ज योजना :-

बँकेने शेतीपुरक व्यवसायाअंतर्गत जिल्ह्यातील तुती लागवड क्षेत्रामध्ये होत असलेली वाढ व त्यानुषंगाने आवश्यक चॉकी पुरवठा विचारात घेता चॉकी सेंटर उभारणीकरिता शेतकऱ्यांना थेट (Direct finance) कर्ज मंजूरीचे धोरण स्विकारले आहे.

चॉकी सेंटर उभारणी प्रकल्पामध्ये तुती लागवड, चॉकी किटक संगोपन गृह उभारणी (RCC Construction), व किटक संगोपन साहित्य (rarering stand, trays, cutting machine, humidifier, heater, incubation chamber etc.) चा समावेश असून ८०० चौ.फुट आकारमानाचे चॉकी सेंटर उभारणीसाठी बांधकामाकरिता (RCC) रु.१०.०० लाख व किटक संगोपन साहित्यासाठी रु.२.०० लाख असे एकूण रु.१२.०० लाख इतकी कर्ज मर्यादा राहील.

- **अटी / शर्ती :-**

१) शेतकरी सभासदास बँकेचा ब वर्ग सभासद असणे आवश्यक असून बँकेच्या नमुन्यात आवश्यक माहितीसह कर्ज मागणी प्रस्ताव बँकेस सादर करावयाचा आहे.

२) सभासदास किमान ३ वर्षाचा तुती लागवड - उत्पादनाचा अनुभव असावा.

३) सदरचे कर्जासाठी लाभार्थ्यांकडे स्वमालकीचे अथवा एकत्र कुटुंबात किमान १ हेक्टर जमीन क्षेत्र असावे.

४) अर्जदाराचे नावाने जमीन क्षेत्र उपलब्ध नसल्यास ज्यांचे नावाने क्षेत्र आहे त्यांनी रु.१००/- चे बॉण्डवरती कर्ज तारण / बोजा नोंद व गहाणखत करणेसाठी संम्मतीपत्र देणे आवश्यक राहील.

५) सभासदाकडील उपलब्ध क्षेत्राचे मुल्यांकन कर्ज रक्कमेपेक्षा जादा होणे आवश्यक असून सदर क्षेत्राचे गहाणखत करुन द्यावे लागेल.

६) कर्ज मंजूरीपोटी ७/१२ उताऱ्यावर कर्ज बोजा नोंद करावा लागेल.

७) सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.

८) अर्जदार सभासदाकडे वि. का. संस्थेशिवाय इतर कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

९) कर्ज कालावधी ६ वर्षे मुदतीचा असून १ वर्ष सवलतीचा कालावधी असेल. कर्जाची परतफेड सहामाही समान १० हप्त्यामध्ये करावी लागेल.

१०) कर्जावरील व्याजदर सभासदास ९.५० टक्के प्रमाणे राहील.

११) सभासदास ठरवून दिलेल्या मुदतीत वसूलपात्र हप्त्याची रक्कम वसूल न झाल्यास १ टक्का जादा व्याज आकारणेत येईल. पुर्वसुचनेशिवाय व्याजदरात बदल करणेचा अधिकार बँकेस राहील.

१२) सदर कर्जास २ सक्षम जामीनदार देणे बंधनकारक राहील.

१३) संलग्न वि. का. सेवा संस्थेने लाभधारक सभासदाकडील कर्ज वसूली बाबतचे हमीपत्र द्यावे लागेल.

१४) चॉकी सेंटर (बाल किटक संगोपन गृह) बांधकामाचा (RCC) आराखडा (plan) व खर्चाचे अंदाजपत्रक (estimate) सादर करावे लागेल.

१५) सदर योजनेअंतर्गत कर्ज वितरण हे खालील पाच टप्प्यामध्ये करणेत येईल.

१. बाल किटक संगोपन गृह बांधकामाकरिता बेसमेन्ट लेवल करिता मंजूर कर्जाच्या ३०% रक्कम

२. लेन्टल लेवल करिता मंजूर कर्जाच्या २०% रक्कम

३. स्लॅब लेवल करिता मंजूर कर्जाच्या २०% रक्कम

४. फिनीशिंग करिता उर्वरित ३०% रक्कम अदा करण्यात येईल.

५. किटक संगोपन साहित्याकरिता रु.२.०० लाख रक्कम अदा करण्यात येईल.

१६) सभासदाकडील कर्ज हप्ता थकीत झालेस संस्थेच्या पुर्व परवानगीशिवाय संस्थेच्या किसान क्रेडीट कार्ड कर्ज खाती रक्कम नावे लिहून वसूल करणेचा अधिकार बँकेस राहील.

१७) मध्यम मुदत कर्ज प्रस्तावाची मुख्यालय मंजूर तारखेनंतर किमान ६ महिन्याच्या आत कर्ज वाटपाची प्रक्रिया पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वाढीव कालावधीत कर्ज वितरण करता येणार नाही.

१८) वेळोवेळी गरजेनुसार वरील अटीत बदल करणेचा तथा जादा अटी लादण्याचा अधिकार बँकेस राहील.

## ११) ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी थेट कर्ज योजना :-

जिल्ह्यातील ऊस लागवड तथा ऊस तोडणी मजूरांचा तुटवडा विचारात घेवून कारखान्याच्या निवडक सभासदांना ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी (Harvestor) खालील अटी / शर्तीनुसार कारखान्यामार्फत निवड केलेल्या शेतकरी सभासदांना बँकेमार्फत थेट स्वरुपाचा (Direct finance) मुदती कर्ज पतपुरवठ्याचे धोरण स्विकारले आहे.

१) शेतकरी सभासदास बँकेचा ब वर्ग सभासद असणे आवश्यक असून बँकेच्या नमुन्यात आवश्यक माहितीसह कर्ज मागणी प्रस्ताव बँकेस सादर करावयाचा आहे.

२) सदरचे कर्जासाठी लाभार्थ्यांकडे एकूण १० एकर जमिनीचे क्षेत्र असावे. सभासदाकडील क्षेत्राचे मुल्यांकन मंजूर रक्कमेपेक्षा कमी पडत असल्यास मुळ मालमत्तेसह अतिरीक्त तारण म्हणून इतर स्थावर / जंगम मालमत्ता गहाणखत करुन कर्ज मंजूरीपोटी ७/१२ उताऱ्यावर बँक कर्जाइतपत कर्ज बोजा नोंद करावा लागेल.

३) सभासद हा बँकेचा नियमीत कर्ज परतफेड करणारा असावा.

४) अर्जदार सभासदाकडे कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी नसावी. बेबाकी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

५) सभासदाच्या सिबिल रिपार्टनुसार सिबील स्कोअर किमान ७०० इतका असणे बंधनकारक राहील.

६) कर्ज कालावधी ७ वर्षे मुदतीचा असून परतफेड वार्षिक समान सात हप्त्यामध्ये करावी लागेल.

७) लाभधारक सभासदाने हंगामात केलेल्या कामापोटी कारखान्याकडून मिळणा-या बिलातून वसूली करुन देण्याबाबत कारखान्याचे हमीपत्र द्यावे लागेल.

८) योजनेनुसार कोटेशन रक्कमेच्या ९०% बँक कर्ज व १०% सभासद स्वगुंतवणूक राहील.

९) कर्जावरील व्याजदर सभासदास १०.०० टक्के प्रमाणे राहील.

१०) सभासदास ठरवून दिलेल्या मुदतीत वसूलपात्र हप्त्याची रक्कम वसूल न झाल्यास १ टक्का जादा व्याज आकारणेत येईल. पुर्वसुचनेशिवाय व्याजदरात बदल करणेचा अधिकार बँकेस राहील.

११) सदर कर्जास २ सक्षम जामीनदार देणे बंधनकारक राहील.

१२) सभासदाने जिल्हा बँकेच्या संयुक्त नावाने ऊस तोडणी यंत्रावर हायर पर्चेस डिड नजरगहाण करुन रजिस्ट्रेशन पुस्तकांत सभासद व बँक यांच्या संयुक्त नावाने नोंद केली पाहिजे.

१३) ऊस तोडणी यंत्र खरेदी रक्कमेइतपत विमा पॉलिसी सभासद व जिल्हा बँक यांच्या संयुक्त नावाने घेऊन बँकेस बेचेन करुन द्यावी. तथा कर्ज परतफेड कालावधीपर्यंत दरवर्षी विमा पॉलिसीचे नुतणीकरण करणे ही सभासदाची वैयक्तीक जबाबदारी राहील.

१४) बँकेचे संपुर्ण कर्ज व्याजासह परतफेड होईपावेतो ऊस तोडणी यंत्र व इतर साहित्याचे हस्तांतर गहाण अथवा विक्री करता येणार नाही. तशा आशयाचे हमी पत्र रु.२००/- च्या स्टॅम्प पेपरवर दिलेल्या जामीनदारासह नोटरी करुन द्यावे लागेल.

## लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, लातूर

## कर्जप्रकारनिहाय व्याजदर

| अ.क्र. | कर्जप्रकार | जि.बँक ते प्रा. संस्था | प्रा. संस्था ते लाभधारक सभासद |
|---|---|---|---|
| १ | इलेक्ट्रीक मोटार पाईप लाईन | ९.५०% | १०.५०% |
| २ | शुभमंगल | ८.००% | ८.००% |
| ३ | तुषार संच | ९.५०% | १०.५०% |
| ४ | दुभती जनावरे | ९.५०% | १०.५०% |
| ५ | ट्रॅक्टर | ९.५०% | १०.५०% |
| ६ | छोटे अश्वशक्ती ट्रॅक्टर | ८.५०% | ९.५०% |
| ७ | ठिबक संच | ९.५०% | १०.५०% |
| ८ | तुती लागवड व रेशीम उद्योग | ०% | ०% |
| ९ | ऊस तोडणी यंत्र (थेट कर्ज) | - | १०% |
| १० | चॉकी सेंटर (थेट कर्ज) | - | ९.५०% |
| ११ | शेडनेट / पॉली हाऊस | ९.५०% | १०.५०% |
| १२ | उच्चशिक्षण | बँक PLR (मार्च २०२४) अधिक १% प्रमाणे<br>Bank PLR ७.५२% + १% =**८.५२%** | |
| १३ | रुपांतर/पुनर्गठण कर्ज | १२.००% | १४.००% |

## क) जनता अपघात विमा योजना :-

बँकेमार्फत जिल्हयातील प्राथमिक सहकारी संस्थांच्या कर्जदार सभासदांसाठी (किसान क्रेडीट कार्डधारकांसाठी) जनता अपघात विमा योजनेची अंमलबजावणी करणेचा निर्णय बँकेच्या मा. संचालक मंडळ सभा दिनांक १४.११.१९९७ अन्वये घेतलेला आहे.

- **योजनेचे स्वरुप व कार्यवाहीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

१. बँकेमार्फत घेतलेल्या जनता अपघात विमा पॉलिसीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विमा कंपनीचे नाव व विमा पॉलिसी क्रमांक | पत्ता | कालावधी | विमा हप्ता रक्कम | विमा जोखीम रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. | लातूर शाखा कार्यालय, लोखंडे कॉम्प्लेक्स, पहिला मजला, सुभाष चौक, लातूर | दि.२५.०५.२०२१ ते २४.०५.२०२४ | २९५ | ३००००० |
| २ | दि न्यु इंडिया एश्युरन्स कंपनी लि. | लातूर विभागीय कार्यालय, "वसंत संकुल", अश्विनी हॉस्पिटल जवळ, औसा रोड, लातूर | दि.०८.०२.२०२२ ते ०७.०२.२०२५ | २८० | ३००००० |
| ३ | दि न्यु इंडिया एश्युरन्स कंपनी लि. | लातूर विभागीय कार्यालय, "वसंत संकुल", अश्विनी हॉस्पिटल जवळ, औसा रोड, लातूर | दि.२२.०२.२०२३ ते २१.०२.२०२६ | ३५४ | ५००००० |
| ४ | दि न्यु इंडिया एश्युरन्स कंपनी लि. | लातूर विभागीय कार्यालय, "वसंत संकुल", अश्विनी हॉस्पिटल जवळ, औसा रोड, लातूर | दि.२१.०३.२०२३ ते २०.०३.२०२६ | ३५४ | ५००००० |
| ५ | दि न्यु इंडिया एश्युरन्स कंपनी लि. | लातूर विभागीय कार्यालय, "वसंत संकुल", अश्विनी हॉस्पिटल जवळ, औसा रोड, लातूर | दि.२०.०३.२०२३ ते १९.०३.२०२६ | ३५४ | ५००००० |
| ६ | दि न्यु इंडिया एश्युरन्स कंपनी लि. | लातूर विभागीय कार्यालय, "वसंत संकुल", अश्विनी हॉस्पिटल जवळ, औसा रोड, लातूर | दि.२०.१२.२०२३ ते १९.१२.२०२६ | ३५५ | ५००००० |
| ७ | दि न्यु इंडिया एश्युरन्स कंपनी लि. | लातूर विभागीय कार्यालय, "वसंत संकुल", अश्विनी हॉस्पिटल जवळ, औसा रोड, लातूर | दि.१४.०३.२०२४ ते १३.०३.२०२७ | ३३६ | ५००००० |

**२. योजनेची व्याप्ती :-**

अ) प्राथमिक सहकारी संस्थेच्या किसान क्रेडीट कार्डधारकासाठीच ही योजना लागू राहील.

ब) सभासदाची वयोमर्यादा ५ वर्षे ते ७० वर्षे पर्यंत राहील. (सर्व प्रकारच्या कर्जासाठी परतफेड कालावधी गृहीत धरुन) (विमा कंपनीच्या अटीस अधिन राहून)

**३. योजनेची वैशिष्टये :-**

अ) सदर योजनेचा विमा कालावधी १ ते ३ वर्षाकरिता राहील.

ब) योजनेमध्ये कार्डधारकास एक ते तीन वर्षाकरिता विम्याचे संरक्षण मिळेल. योजनेअंतर्गत विमा संरक्षण हे विमा हप्ता रक्कम कर्ज खात्यास नावे लिहीलेनंतर विमा कंपनीकडे पोहंच झालेल्या तारखेपासून लागू होईल.

क) कर्जदार सभासदास विमा हप्ता रक्कम निर्णयानुसार बंधनकारक राहील.

ड) विमा संरक्षित रक्कम रु.५०००००/- पर्यंत राहील.

**४. विमा पॉलिसीचे फायदे :-**

विमा पॉलिसीचे फायदे संबंधित विमा कंपनीच्या अटी व नियमास अधिन राहून राहतील.

**५. पॉलिसीधारक व्यक्तीचे अपघाती निधन झालेस :-**

अपघाताबाबत लेखी सुचनापत्र सभासदाचे वारसाने किंवा संस्था ठरावान्वये १५ दिवसाचे आत बँक शाखेस कळवून मुख्यालयामार्फत विमा कंपनीकडे कळविणे आवश्यक आहे. सदर सुचनापत्रावर विमा कंपनीची पोहंच घेऊन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. घटना घडलेपासून ३० दिवसाचे आत संबंधित संस्थेने बँकेच्या शाखेमार्फत मयत / अपंग सभासदाचे विमा क्लेम प्रस्ताव दोन प्रतीत मुख्यालयास पाठविण्यात यावेत.

- **सुचनापत्रासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे दोन प्रतीमध्ये मुख्यालयास सादर करावेत :-**

  १) वारसाचा अर्ज

  २) संस्थेचा ठराव / शिफारस पत्र (मयत सभासदाचे नाव, विमा हप्ता नावे रक्कम, यादीतील क्रमांक, मृत्यू दिनांक इ. तपशील असावा)

  ३) शाखा तपासणीस शिफारस पत्र (संस्थेचे नाव, मयत सभासदाचे नाव, विमा हप्ता नावे रक्कम, यादीतील क्रमांक, मृत्यू दिनांक इ. तपशील असावा)

- **प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे दोन प्रतीमध्ये मुख्यालयास सादर करावेत :-**

  **१)** क्लेम इंटिमेशन (सुचनापत्र)

  **२)** विमा दावा फॉर्म (वारसाच्या सहीने)

  **३)** मृत्यु प्रमाणपत्र (मुळ), रहिवासी प्रमाणपत्र (मुळ), वारसाचे प्रमाणपत्र (मुळ)

  **४)** घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, पोस्टमार्टेम रिपोर्ट, व्हिसेरा रिपोर्ट (पोलिस विभागाने सत्यप्रत केलेले असावे)

  **५)** सभासद प्रमाणपत्र, संस्था ठराव

  **६)** जनता अपघात विमा यादी छायांकित प्रत व त्यावेळचा संस्थेचा ठराव

७) वयाचा पुरावा - मतदान ओळखपत्र / टी.सी. / निर्गम उतारा /आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स

८) सभासदाचे केसीसी पासबुक छायांकित प्रत व ७/१२ उतारा, ८अ

९) रु.१००/- चे बॉण्डवर नोटरी करुन वारसाचे शपथपत्र

१०) फिर्याद किंवा एम.एल.सी. पत्र, पोलिस स्टेशनचा अखेरचा रिपोर्ट (चार्ज शीट), एफ.आय.आर.

११) तपास टिपण, जाहीर प्रगटन, तहसील पंचनामा

१२) पोलिसांनी घेतलेले साक्षीदार जबाब

१३) वाहन / मोटार सायकल चालविण्याचा परवाना

१४) मा. तालुका दंडाधिकारी यांचा मयतबाबत अंतिम आदेश प्रत

१५) सभासदास दवाखान्यात विलाज / तपासणी केली असल्यास त्याबाबत सदरील दवाखान्याचे बिले व सदरील डॉक्टरचे प्रमाणपत्र

१६) अपघाती अपंगत्वाबाबत सिव्हील सर्जनचे प्रमाणपत्र (मुळ)

वरीलप्रमाणे कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रमाणित करुनच दाखल कराव्यात.

**६. अपघातामुळे कायमचे अपंगत्व अथवा अवयव गमावलेस (निकामी):-**

१) अपघाताची सुचना संबंधित पोलिस स्टेशनला देवून पंचनामा करुन घेणे आवश्यक आहे.

२) अपघातानंतर ज्या दवाखान्यात दाखल (ॲडमीट) केले असेल तेथील ॲडमीट व डिसचार्ज कार्ड घ्यावे.

३) जखमीला दवाखान्यात कोणत्या कारणासाठी व कशासाठी ॲडमीट केले होते त्याबाबत डॉक्टरचे प्रमाणपत्र जोडावे.

४) डॉक्टरांचे ट्रिटमेंट (उपचार केलेबाबतचे) सर्टिफिकेट जोडावे.

५) एखादा अवयव गमावलेस अथवा अपघातामुळे कापून काढला असेल तर तो भाग दर्शविणारा फोटो जोडावा.

६) डॉक्टरांचे औषधी बिले व पावत्या सोबत जोडण्यात याव्यात तसेच एक्स-रे व सर्व मेडीकल रिपोर्ट सोबत द्यावेत.

७) सिव्हील सर्जनचा अपंगत्वाचा दाखला सोबत जोडण्यात यावा.

वरीलप्रमाणे योजनेमध्ये आजारपणामुळे नैसर्गिक मृत्यु झाल्यास किंवा आत्महत्या केल्यास नुकसान भरपाई मिळणार नाही. अपघाता व्यतिरिक्त इतर कारणामुळे उदा. मारामारी, वादविवाद वगैरे कारणामुळे अपंगत्व अगर मृत्यु आलेस तसेच मद्यपान, ड्रग्ज सेवनाने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मृत्यु झाल्यास विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

**७. जनता अपघात विमा प्रस्ताव पाठविताना शाखेने घ्यावयाच्या दक्षतेबाबत व कार्यवाहीबाबत :-**

१. शाखेने विमा कंपनीस सुचनापत्र देणेअनुषंगाने मुदतीत (१५ दिवसात) कार्यवाही करावी.

२. मयत सभासदाचा विमा दावा प्रस्ताव ४ प्रतीमध्ये तयार करुन घ्यावा. त्यापैकी एक मुळ प्रत व उर्वरित ३ सत्यप्रत केलेली असावी.

३. तपासलेल्या ४ प्रस्तावापैकी २ प्रस्ताव संस्था ठरावासह बँकेच्या मुख्यालयास सादर करावेत.

४. मुख्य कार्यालय विमा प्रस्तावाची एक प्रत स्वतःकडे ठेवून एक प्रत विमा कंपनीकडे पाठवून पोहंच घेईल. तसेच एक प्रत शाखा दप्तरी व एक प्रत संस्थेच्या दप्तरी ठेवण्यात यावी.

५. सभासद विमा हप्ता रक्कम संस्थेच्या किसान क्रेडीट कार्ड व कर्ज खाती नावे टाकण्याचा अधिकार शाखा तपासणीस यांना आहे. मात्र असे करण्यापुर्वी संबंधित संस्थेने रक्कम सभासद कर्ज खाती नावे लिहून वर्ग करणेबाबतचा ठराव सही शिक्क्यानिशी शाखा दप्तरी दाखल करुन घ्यावा.

६. किसान क्रेडीट कार्ड धारकाचा विमा हप्ता कर्ज खात्यास नावे लिहीलेपासून ते विमा कंपनीकडे जमा होईपर्यंतच्या कालावधीत एखाद्या सभासदाचा मृत्यु झाल्यास त्याकरिता बँक अथवा विमा कंपनी जबाबदारी राहणार नाही.

७. प्राप्त नुकसान भरपाई रक्कमेतून प्रथमतः सभासदाकडील कर्जबाकी रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम मयत प्रकरणान्वये संबंधित वारसास अदा करण्यात येईल.